# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक २४ जुलै, २०१७ / श्रावण २, १९३९ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२) परिवहन, खारभूमी विकास मंत्री** | |
| **(३) कृषी आणि फलोत्पादन मंत्री** | |
| **(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** | |
| **(५) पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ७३**

---

### राज्यातील शासकीय इमारतींमध्ये एल.ई.डी. दिवे लावण्याबाबत

**(१) * ३३५९९ श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाच्या दिड हजार इमारतींसाठी सामंजस्य करारानुसार शासनाच्या १ हजार ५०० इमारतीमध्ये ट्युब लाईटच्या जागी एल.ई.डी. दिवे लावून ऊर्जा बचत करण्याकरीता रूपये सव्वा तीनशे कोटीची भांडवली गुंतवणूक EESL मार्फत करण्याचा निर्णय शासनाने माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू ऊर्जा बचत करणारी एल.ई.डी. दिवे लावण्याकरीता केंद्र व राज्य शासनातर्फे एकूण किती निधी EESL यांना उपलब्ध करुन देण्यात आला आहे व दिड हजार शासकीय इमारतींपैकी किती इमारतीमध्ये एल.ई.डी. दिवे बसविण्याचे काम माहे जून, २०१७ अखेर पूर्ण करण्यात आले आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.
(२) सदरहू ऊर्जा बचत करणारी एल.ई.डी. दिवे लावण्याकरीता राज्य शासनातर्फे कोणताही निधी उपलब्ध करुन देण्यात आला नसून संपूर्ण खर्च EESL मार्फत करण्यात येणार आहे. EESL तर्फे फक्त एल.ई.डी. दिवे लावण्यात येत नसून वातानुकुलित यंत्रे, पंखे व स्ट्रीटलाईट्स व ट्युबलाईट्स सुध्दा लावण्यात येणार आहेत. मे, २०१७ मध्ये व्यवस्थापकीय संचालक EESL यांचेसोबत करण्यात आलेल्या MOU (सहमतीनामा) नुसार हे उद्दीष्ट ३ वर्षात पूर्ण करावयाचे आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अहमदनगर शहरातून जाणाऱ्या राज्य महामार्गावरील हॉटेल यश पॅलेस ते डी.एस.पी. चौक या उड्डाणपुलाचे काम पूर्ण करण्याबाबत**

**(२) * ३३०३५ डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर शहरातून जाणाऱ्या राज्य महामार्गावरील हॉटेल यश पॅलेस ते डी.एस.पी. चौक या उड्डाणपुलाचे काम अनेक वर्षापासून प्रलंबित असल्यामुळे वाहतूक कोंडी होऊन नागरिकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार सदर उड्डाणपुलाचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अहमदनगर शहरातून जाणा-या राज्य महामार्गावरील हॉटेल यश पॅलेस ते डी.एस.पी. चौक या उड्डाणपुलाचे काम प्रलंबित आहे हे खरे आहे. तथापी अहमदनगर बाह्यवळण रस्ता पुर्ण झाल्याने वाहतुक कोंडी कमी झाली आहे.

(२) शिरूर अहमदनगर रा.मा. ६० ह्या चौपदरीकरणाच्या कामामध्ये अहमदनगर शहरातील १.२० कि.मी. लांबीचा उड्डाणपुलास सन २००९ मध्ये मान्यता देण्यात आली होती. तथापी उद्योजकाकडून सन २०१० मध्ये भुसंपादन होणे आवश्यक असताना सन २०१२ मध्ये भुसंपादन पुर्ण झाले. भुसंपादनासाठी उद्योजकाकडून मागणी करण्यात आलेली अतिरिक्त रक्कम शासनाने नाकारली असल्याने लवाद मंडळाची स्थापना करण्यात आली आहे.

सक्कर चौक ते डी.एस.पी. चौक हा भाग राष्ट्रीय महामार्ग क्र. ६१ मध्ये समाविष्ट असल्याने खाजगीकरणातून हे काम वगळण्याचा प्रस्ताव असून अहमदनगर शहरातील उड्डाणपुल बांधण्याचे काम रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाच्या सन २०१७-१८ च्या वार्षिक अहवालामध्ये प्रस्तावित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सालेकसा (जि.गोंदिया) तालुक्यातील गावांमध्ये**
**बस सेवा उपलब्ध करून देण्याबाबत**

**(३) * ३२९६२ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सालेकसा (जि.गोंदिया) तालुक्यातील ७५ टक्के गावांमध्ये राज्य मार्ग परिवहन महामंडळाची बस सेवा नसल्यामुळे वृध्द, अपंग, गरोदर महिला, विद्यार्थी व नागरिक यांना गावांपासून इतर ठिकाणी प्रवास करणे गैरसोयीचे होत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांनी शासनाकडे मागणी व निवेदने करूनही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर गावात बस सेवा उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) नाही.

(२) व (३) स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार मे, २०१७ मध्ये गोंदिया ते बिजेपार मार्गे गोरे, लोहारा या मार्गावर बस फेरी सुरु करण्यात आली आहे. गोंदिया जिल्ह्यातील सालेकसा तालुक्यात ८६ गावे असून मानव विकास योजनेंतर्गत व प्रवाशांकरिता ८० गावांना थेट सेवा देण्यात आली आहे. ६ गावे मुख्य रस्त्यापासून ३ ते ३.५ कि.मी. अंतरापर्यंत असून त्यांचा रस्ता अरुंद असल्याने त्यांना थेट बस सेवा देता येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्हयातील अधिक गटांच्या सातबारावरील क्षेत्र आणि प्रत्यक्षातील क्षेत्रात तफावत असल्याबाबत

**(४) * ३२३७३ श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने ई-फेरफाराची अंमलबजावणी केली असता या संगणकीकृत सातबाराच्या तपासणीत पुणे जिल्हयातील ४५ हजारापेक्षा जास्त गटांच्या सातबारावरील क्षेत्र आणि प्रत्यक्षातील क्षेत्र यात तफावत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार मूळ सातबारामध्ये फेरफार करणाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) पुणे जिल्हयातील ४५ हजारापेक्षा गा.न.नं. ७/१२ वरील क्षेत्र आणि प्रत्यक्षातील क्षेत्र यात मोठी तफावत आहे, ही बाब पूर्णत: खरी नाही. गा.न.नं. ७/१२ वरील एकूण क्षेत्र व त्यातील भोगवटादारांच्या नावासमोर लिहिण्यात आलेल्या क्षेत्राची बेरीज यामध्ये तफावत असणाऱ्या गा.न.नं. ७/१२ ची संख्या पुणे जिल्ह्यात ३७,६७० एवढी आहे.

सदरच्या चुका या गा.न.नं. ७/१२ चे पोटहिस्से पाडताना, कमी जास्त पत्रके तयार करताना, गा.न.नं. ७/१२ पुनर्लेखन / प्रख्यापन करताना व मंजूर फेरफार अंमल घेताना हस्तदोषामुळे होऊ शकतात. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील कलम १५५ व २५७ अन्वये अशा चुका दुरुस्त करण्याविषयी कार्यपध्दती विहित करण्यात आलेली आहे.

-----------------

**राज्यातील शालेय विद्यार्थ्यांची अवैध वाहनातून होणारी वाहतुक बंद करण्याबाबत**

**(५) * ३०९२५ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाळांमध्ये मुलांना ने-आण करणाऱ्या शालेय बसच्या सुरक्षेच्यादृष्टीने खाजगी शालेय बस मालकांनी शाळांबरोबर कॉमन स्टॅडर्ड ॲग्रिमेंट करार केला असेल तरच त्या बसना परवानगी द्यावी असे निर्देश मा.उच्च न्यायालयाने परिवहन विभागाला दिलेले असतांनाही मुंबई शहर आणि उपनगरात तसेच संपूर्ण राज्यात अवैध वाहनातून शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करण्यात येत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खासगी शालेय बस गाड्या व्यतिरिक्त रिक्षा, बेस्ट व व्हॅन या छोटया वाहनांमधून मुलांना शाळेत ने-आण करण्यास बंदी करण्याबाबत मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.उच्च न्यायालयाने स्कूलबसच्या सुरक्षेबाबत केलेल्या निर्देशांची अंमलबजावणी करण्याबाबत तसेच छोट्या वाहनातून शाळेतील मुलांना ने-आण करण्यावर बंदी आणण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे नाही.

(२) पीटीए युनायटेड फोरम यांनी या विषयी जनहित याचिका मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अलिबाग-मांडवा व अलिबाग-रेवस (जि.रायगड)**
**या रस्त्यांचे नुतनीकरण करण्याबाबत**

**(६) * ३३३८८ श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३००८६ ला दिनांक १७ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यात सन २०१६ मध्ये झालेल्या पावसामुळे अलिबाग-मांडवा व अलिबाग-रेवस या रस्त्यांची दुरवस्था झाली असून त्यावर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तात्पुर्ती कार्यवाही करण्यात येत असून सदर रस्त्याची पुन्हा दुरवस्था झाली आहे तसेच या रस्त्यांवर मोठया प्रमाणात कंटेनरसह अन्य वाहनांचा वावर असल्याने या रस्त्यांवरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना अनेक गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत असून या रस्त्यावर वारंवार अपघात होत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अलिबाग-मांडवा व अलिबाग-रेवस या रस्त्यांसह अन्य रस्त्यांचे नुतनीकरण करण्याबाबत ग्रामस्थांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अलिबाग यांच्याकडे मागील १ वर्षापासून मागणी केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

प्रश्नांकीत रस्ता प्र.रा.मा. ४ चा भाग आहे. या भागाची लांबी ११ कि.मी. आहे. रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावर पडलेले खड्डे भरण्यात आले असून रस्त्यावरुन वाहतूक सुरळीत सुरु आहे.

(२) होय. निवेदन प्राप्त आहे.

(३) व (४) रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागाचे रुंदीकरण करुन इतर आवश्यक सुधारणांची कामे मंजूर आहेत. सदर कामाची निविदा मसुदा मंजुरीची कार्यवाही प्रगतीत आहे.

-----------------

**शिवाजीनगर (जि.पुणे) येथील पोलीस वसाहतीची दुरवस्था झाल्याबाबत**

**(७) * ३१९९७ ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवाजीनगर (जि.पुणे) येथील पोलीस वसाहतीची दुरवस्था झाली असून पावसाळ्यात गळतीमुळे इमारत कोसळण्याची शक्यता निर्माण झाल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर वसाहतीची पुनर्बांधणी करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे. (शिवाजीनगर, जि.पुणे येथील पोलीस वसाहतीतील आर. सी. सी. इमारती सुस्थितीत असून बैठया चाळींची दुरवस्था झाली आहे)

(२) पोलीस मुख्यालय शिवाजीनगर येथील बैठया चाळी सुमारे १०० वर्षापेक्षा जास्त कालावधीच्या आहेत. त्यामुळे सदर बैठया चाळी जीर्ण झाल्या असून त्या राहण्यास धोकादायक असल्याचे मे, २०१४ मध्ये गृह विभागास कळविण्यात आले आहे. सदर बैठया चाळींच्या पुनर्बांधणीबाबतची कार्यवाही महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण महामंडळ, मुंबई यांचेमार्फत प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अरबी समुद्रात उभारावयाच्या छत्रपती शिवाजी महाराजाच्या स्मारकाबाबत**

**(८) * ३१५१७ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक २७३०४ ला दिनांक १० मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई जवळ अरबी समुद्रात उभारावयाच्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या महत्वाकांक्षी स्मारकाचे मा.पंतप्रधान यांच्या हस्ते दिनांक २४ डिसेंबर, २०१६ रोजी जलपूजन झाल्यानंतर अद्यापही स्मारकाच्या कामास सुरुवात झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या महत्वाकांक्षी शिवस्मारक प्रकल्पासाठी लागणारा रूपये ३६०० कोटींचा निधी कशाप्रकारे उभा केला जाणार याबाबतचा तपशील सादर करावा, असे आदेश मा.उच्च न्यायालयाने दिनांक ६ एप्रिल, २०१७ रोजी एका जनहित याचिकेच्या सुनावणीच्यावेळी राज्य शासनास दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे स्वरुप काय आहे, शिवस्मारक उभारण्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय. (दि.२४ डिसेंबर, २०१६ रोजी जलपूजन झाले)
(२) दिनांक ६ एप्रिल, २०१७ रोजीच्या या प्रकल्पाबाबतच्या जनहित याचिकेच्या सुनावणी वेळी, या प्रकरणी शासनाने प्रतिज्ञापत्र दाखल करावे, असे मा.उच्च न्यायालयाने आदेशित केले आहे.
(३) मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, महाराष्ट्र शासनाने दिनांक २५/०५/२०१७ रोजी प्रतिज्ञापत्र उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल केले आहे. सद्यःस्थितीत प्रकल्पासाठी प्राप्त निविदा उघडून तांत्रिक मुल्यांकन पूर्ण करुन आर्थिक देकार उघडण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे व निम्नतम देकार असणा-या कंत्राटदाराकडून त्याच्या देकारार्थ स्पष्टीकरण मागविण्यात आले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बीड जिल्ह्यात गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेतील प्रलंबित प्रस्ताव निकाली काढण्याबाबत

**(९) * ३१५३७ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.विनायकराव मेटे, श्री.रामहरी रुपनवर : तारांकित प्रश्न क्रमांक २७०३४ ला दिनांक १७ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्ह्यात गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेंतर्गत दिनांक १ डिसेंबर, २०१५ ते दिनांक ३० नोव्हेंबर, २०१६ या कालावधीत २३६ प्रस्ताव कृषी विभागाकडे दाखल करण्यात आले असून प्राप्त प्रस्तावांची छाननी करून कृषी विभागाने विमा कंपनीकडे पाठविलेल्या प्रस्तावांपैकी १३४ प्रस्तावाबाबत कंपनीने एक वर्ष कोणताही निर्णय घेतला नसून २३ प्रस्ताव नामंजूर केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेचे नामकरण करून विम्याची रक्कम रु. २ लक्ष केल्यानंतर विमा कंपनीने प्रस्ताव नामंजूर करणे आणि प्रस्ताव प्रलंबित ठेवण्याचे प्रकार वाढत आहे, या योजनेंतर्गत किती प्रकरणे विमा कंपनीने नामंजूर केली आहेत तसेच, किती प्रकरणे प्रलंबित आहेत,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शेतकऱ्यांचे विमा कंपनीकडे प्रलंबित असलेले प्रस्ताव निकाली काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) बीड जिल्ह्यात गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेंतर्गत दि. १ डिसेंबर, २०१५ ते दि. ३० नोव्हेंबर, २०१६ या कालावधीत २३० प्रस्ताव विमा कंपनीकडे दाखल करण्यात आले. त्यापैकी १०७ प्रस्ताव मंजूर असून ५४ प्रस्ताव नामंजूर झाले आहेत. तर ६९ प्रस्ताव विमा कंपनीकडे प्रलंबित आहेत.
(२) या योजनेंतर्गत राज्यभरातून एकूण ३८५१ प्रकरणे विमा कंपनीकडे दाखल करण्यात आलेली आहेत. त्यापैकी २१०४ प्रकरणे मंजूर असून ६५० प्रकरणे नामंजूर आहेत व १०९७ प्रकरणे विमा कंपनीकडे कार्यवाहीत आहेत.
(३) विमा कंपनीकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावांबाबत जिल्हा, विभाग, कृषि आयुक्तालय व राज्यस्तरावर नियमितपणे आढावा घेऊन पाठपुरावा करण्यात येत आहे. प्रकरणांमधील त्रुटी दूर करण्यासाठी जिल्हास्तरावर विशेष कॅम्प घेण्यात येत आहेत. प्रलंबित असलेले प्रस्ताव निकाली काढण्याबाबत कंपनीस वेळोवळी पत्र, तसेच नोटीस देऊन पाठपुरावा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सातारा जिल्ह्यात अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(१०) * ३१०२९ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माण, खटाव, फलटण, कोरेगाव, खंडाळा, पाटण, कराड, सातारा व जावली (जि.सातारा) या तालुक्यात अवकाळी पाऊस, गारपीट यामुळे घराचे पत्रे, विजेचे खांब पडले असून वित्तहानी झाल्याचे दिनांक ५ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उंब्रज (ता.कराड, जि.सातारा) येथे झालेल्या अवकाळी पावसामुळे सुमारे दिडशेहून अधिक एकरावरील टोमॅटो व इतर फळभाज्या व पालेभाज्यांच्या लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) भाजीपाला नुकसान क्षेत्र ९ हे.आर.११ आर व फळपिक नुकसान क्षेत्र ११ हे.आर ५२ असे एकूण २० हे.आर क्षेत्राचे नुकसान झाले आहे.

(३) अवेळी पाऊस व गारपिटीमुळे शेतीपिकांची नुकसानभरपाई देण्यासाठी, झालेल्या नुकसानीची आकडेवारी क्षेत्रिय कार्यालयांकडून अचूक पंचनामे करुन मागविण्यात आली आहे. सदर माहिती संकलित करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. यासंदर्भात प्राप्त होणाऱ्या माहितीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबचा निर्णय घेण्याची बाब प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई-गोवा महामार्गावरील जगबुडी नदीवरील पुलाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(११) * ३२४१९ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गावरील जगबुडी नदीवरील ब्रिटीशकालीन पुल धोकादायक झाल्यामुळे या ठिकाणी बांधण्यात येणारा नवीन पुल अडीच वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार प्रलंबित पुलाचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ कि.मी. १७८/८५० जगबुडी नदीवरील ब्रिटीशकालीन बांधकामाचा पूल धोकादायक नसून वाहतूक वर्दळीच्या गरजेच्या दृष्टीने सदरील पूल अरुंद असल्याने जगबुडी नदीवर नवीन दोन पदरी पूल बांधण्याचे काम ऑगस्ट, २०१४ मध्ये हाती घेतलेले आहे. सद्यस्थितीत पुलाचे बांधकाम पूर्ण झाले असून जोडरस्त्यांचे काम प्रलंबित आहे.

तसेच मुंबई गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणांतर्गत जानेवारी २०१५ मध्ये जगबुडी नदीवर अजून एक दुपदरी पूलाचे बांधकाम हाती घेण्यात आले आहे. सद्यस्थितीत पुलाचे बांधकाम ६० टक्के पूर्ण झाले असून उर्वरीत बांधकाम प्रगतीत आहे.

(२) मुंबई गोवा महामार्गावरील भरणे नाका येथील प्रस्तावित भुयारी मार्गामुळे ऑगस्ट, २०१४ मध्ये बांधकाम सुरु केलेल्या जगबुडी पुलाची उंची वाढविणे आवश्यक झाल्याने पुलाच्या संकल्पनामधील व वावातील बदल तसेच जोडरस्त्यांच्या लांबीत झालेली वाढ व भुसंपादनास झालेला विलंब या बाबींमुळे पुलाच्या बांधकामास विलंब झालेला आहे. जमिनीचा ताबा मिळताच पोचमार्गाचे बांधकाम तात्काळ हाती घेऊन पूर्ण करण्यात येईल.

तसेच जानेवारी, २०१५ मध्ये बांधकाम सुरु केलेल्या नवीन दुस-या पुलाचे काम जीवन प्राधिकरणाच्या जल वाहिनीच्या स्थलांतरास झालेल्या विलंबामुळे रखडले होते. सद्यस्थितीत जलवाहिनी स्थलांतराचे काम पूर्ण झालेले आहे. तसेच जोडरस्त्याच्या भूसंपादनापोटी मावेजा वाटपाचे काम प्रगतीत असून जमिनीचा ताबा मिळताच पोचमार्गाचे बांधकाम तात्काळ हाती घेऊन पूर्ण करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर, तलासरी व डहाणू (जि.पालघर) या तालुक्यात अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्तांना मदत देण्याबाबत

**(१२) * ३३६३९ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर, तलासरी आणि डहाणू (जि.पालघर) या तालुक्यात माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे २५ घरांची पडझड होऊन आर्थिक नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिवृष्टी झाल्याने संबंधित बाधित कुटुंबाना नुकसान भरपाई मिळणेबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, पालघर यांनी जा.क्र.सामान्य/कक्श१/टे-२/न.आ./कावि-५०८/२०१६, दि.२८/०९/२०१६ अन्वये विभागीय आयुक्त, कोकण यांस पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रस्तावावर शासनाने निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय
(२) होय
(३) अनुदान वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राष्ट्रीय महामार्ग क्र.१६६ वरील कळंबी शहरातून बाहय वळण (बायपास) करण्याबाबत

**(१३) * ३३२६८ श्री.तानाजी सावंत :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय महामार्ग क्र.१६६ हा रस्ता कळंबी शहरातून जात असल्यामुळे वाहतुक कोंडी होऊन नागरिकांची गैरसोय होत असल्यामुळे कळंबी शहरातून बाहय वळण (बायपास) करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी तसेच, स्थानिक नागरिकांनी पत्राद्वारे शासनाकडे केली असल्याचे माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) व (२) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याची अभिलेख्यात नोंद नाही. राष्ट्रीय महामार्ग १६६ वर कळंब हे गाव नसून कळंबी हे गाव आहे.

तथापि, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत राष्ट्रीय महामार्ग १६६ च्या सांगली ते सोलापूर ह्या भागामध्ये चौपदरीकरणाच्या प्रस्तावित प्रकल्पामध्ये मिरज तालुक्यातील कळंबी गावामधील रस्त्याच्या दोन्ही बाजूला असलेली घरे व रस्त्याची वळणे विचारात घेऊन रस्त्याच्या आखणीमध्ये सुधारणा करण्यात येणार असल्याने चौपदरी महामार्ग गावाबाहेरुन जाणार आहे. तसेच

चौपदरीकरणाच्या प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी संयुक्त मोजणीची प्रक्रिया प्रगतीत असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, सोलापूर यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**नाशिक शहरातील राज्य परिवहन महामंडळाच्या शहर बससेवेच्या फेऱ्या पूर्ववत सुरू करण्याबाबत**

**(१४) * ३०९४७ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहर बस वाहतुकीमुळे राज्य परिवहन महामंडळ तोट्यात येत असल्यामुळे नाशिक शहर बस वाहतूक दिनांक १ फेब्रुवारी, २०१७ पासून महामंडळाकडून बंद करण्यात येईल असे राज्य परिवहन महामंडळाने आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांना दिनांक ३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक शहर बससेवेच्या फेऱ्या माहे एप्रिल, २०१७ पासून कमी करण्यात आल्यामुळे नाशिक शहरातील शालेय विद्यार्थी व प्रवाशांचे हाल होत असल्यामुळे सदर फेऱ्या पूर्ववत सुरु करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने बससेवेच्या फेऱ्या पूर्ववत सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) राज्य परिवहन महामंडळाने नाशिक महापालिकेस शहर बस सेवेमुळे होणाऱ्या तोटयाची भरपाई करावी, अन्यथा शहर बससेवा दिनांक ०१/०२/२०१७ पासून बंद करण्यात येईल, असे दिनांक ०३/०१/२०१७ च्या पत्रान्वये कळविले होते. तथापि, महापालिकेकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही, त्यामुळे माहे मे, २०१७ मध्ये महामंडळाद्वारे नाशिक शहर बससेवेच्या फेऱ्या टप्प्याटप्याने कमी करण्यात आल्या होत्या.

(३) राज्य परिवहन महामंडळाद्वारा दिनांक १५/०६/२०१७ पासून नाशिक शहर वाहतुकीची १० नियते, १६० फेऱ्या व २०१५ कि.मी., तसेच, भगूर ते महात्मानगर अशी फेरी सुरु करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**पालघर जिल्ह्यातील किनारपट्टीवरील धूपप्रतिबंधक बंधारे बांधण्याबाबत**

**(१५) * ३३३८६ श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) किनारपट्टीवरील दिवा-दांडीचा संरक्षक धूपप्रतिबंधक बंधारा खचल्याने किनारपट्टीवरील गावाची सुरक्षा धोक्यात आल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे, खरे आहे काय,

(२) असल्यास, सातपाटी, नवापूर, तारापूर, धिवलीसह (जि.पालघर) अन्य गावांलगतच्या किनारपट्टीवरील उभारण्यात येणारे धूपप्रतिबंधक बंधा-यांची मंजूरी महाराष्ट्र किनारा व्यवस्थापन प्राधिकरणाने ना मंजूर केल्याने किना-यावरील मच्छिमारांच्या जीवीतास मोठा धोका निर्माण झाल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पालघर जिल्ह्यातील किनारपट्टीवरील गावांच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने धुपप्रतिबंधक बंधारे बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) होय, अंशत: खरे आहे.

(३) सातपाटी, नवापूर, तारापूर व एडवण (ता.जि.पालघर) येथे बांधावयाच्या समुद्र धूपप्रतिबंधक बंधाऱ्याच्या कामाचा सदर प्रस्ताव महाराष्ट्र किनारा व्यवस्थापन प्राधिकरण (MCZMA) यांच्या दि.२८/६/२०१७ रोजीच्या बैठकीत फेरसादर करण्यात आला असता प्राधिकरणाने मंजूरीबाबत सकारात्मक भूमिका घेतली असून बैठकीचे इतिवृत्त महाराष्ट्र किनारा व्यवस्थापन प्राधिकरण यांचेकडून अद्याप अप्राप्त आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्हयातील दुष्काळग्रस्त गावांना दुष्काळमुक्त करण्याबाबत

**(१६) * ३१४०७ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड : दिनांक ३० मार्च, २०१७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ४ मधील प्रश्न क्रमांक २१९५० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खरीप हंगामात सांगली जिल्हयातील ८ गावांची अंतिम पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी आल्याने शासनाने सदर गावे दुष्काळसदृश्य म्हणून जाहिर केल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दुष्काळग्रस्त गावांमध्ये कवठेमहांकाळ तालुक्यातील २ गावे व जत तालुक्यातील ५ गावांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सांगली जिल्हयातील गावांना दुष्काळमुक्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. एससीवाय-२०१६/प्र. क्र. ५३७/म-७ दिनांक १० फेब्रुवारी, २०१७ अन्वये अंतिम पैसेवारी कमी असलेल्या सांगली जिल्हयातील ८ गावांमध्ये दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहीर करून विविध उपाययोजना जाहीर करण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्हयातील पुलांची दुरूस्ती करण्याबाबत

**(१७) * ३२२२१ ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.नारायण राणे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील २५६ पूल नादुरुस्त असून १७ पुलांची पुनर्बांधणी करण्याची आवश्यकता असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुलांची दुरुस्ती व पुनर्बांधणी करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय,

रत्नागिरी जिल्हयातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील रस्त्यांवर ४२९ पूल आहेत. यापैकी २५६ पूलांची दुरुस्ती करणे आवश्यक असून १७ पूलांची पुनर्बांधणी भौमित्तीक कारणामुळे करणे आवश्यक असल्याचे सर्वेक्षणातून दिसून आले आहे.
(२) व (३) २५६ पूलांच्या दुरुस्तीच्या कामांपैकी २८ पूलांच्या दुरुस्तीची कामे प्रगतीत आहेत. दुरुस्ती आवश्यक पूल व भौमित्तिक कारणासाठी पुनर्बांधणी आवश्यक पूल वाहतूकीसाठी सुरक्षित आहेत.

उर्वरित पूलांची दुरुस्तीची व पुनर्बांधणीची कामे मंजूरी, निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

**मुरूड बंदर (ता.मुरूड, जि.रायगड) येथे मच्छिमार जेट्टी बांधण्याबाबत**

**(१८) * ३३५७२ श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक २८१०३ ला दिनांक १० मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुरूड बंदर (ता.मुरूड, जि.रायगड) येथील समुद्र किनाऱ्यावर मासेमारी बोटी लावण्यासाठी शासनाने येथे जेट्टी बांधण्याचा निर्णय घेतला असून प्रस्ताव मंजूर केल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जेट्टीचे बांधकाम अद्याप सुरु केले नसल्याने तेथील मच्छिमार बांधवांना वाळूतच आपल्या बोटी ठेवाव्या लागल्यामुळे अनेक बोटीचे वादळी पावसात नुकसान होत असून याठिकाणी पर्यटनासाठी आलेले पर्यटकही बुडण्याचे प्रकार घडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर ठिकाणी जेट्टी बांधण्याचे काम करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रश्नाधीन जेट्टीचे काम पूर्ण झाले आहे. पावसाळयात मासेमारी बंद असल्यामुळे वादळी पावसात बोटीचे नुकसान होण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

पर्यटनासाठी आलेले पर्यटक बुडण्याचे प्रकार घडतात, परंतु अशा घटनांचा जेट्टी बांधकामाशी संबंध नाही.

(३) रा.कृ.वि. योजना सन २०११-१२ अंतर्गत मुरुड, ता. मुरुड, जि. रायगड येथे मच्छिमारांसाठी मासे उतरविण्यासाठी मुलभूत सुविधा पुरविणे व जेट्टीचे बांधकाम करण्यासाठी शासन निर्णय क्र. मत्स्यवि-२०११/ प्र.क्र. २८७/ पदुम-१४, दिनांक १५/१२/२०११ अन्वये रुपये १७८.४९ लक्ष इतका निधी मंजूर करण्यात आला असून, रुपये १५९.८३ लक्ष इतका निधी खर्च करण्यात आला आहे व त्यानुसार जेट्टीचे काम पूर्ण झाले आहे. हा समुद्र किनारा धोकादायक असून समुद्रात उतरलेले पर्यटक बुडण्याच्या संतत घटना घडत असतात, त्यावर उपाययोजना म्हणून धोक्याचे फलक, जीवरक्षक नेमणूक इ. करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ठाणे शहरात कालबाह्य झालेल्या रिक्षा अनधिकृपणे सुरू असल्याबाबत**

**(१९) * ३२८०९ श्री.प्रविण दरेकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कालबाह्य झालेल्या आणि नियमांचे उल्लंघन करून एकाच परमिटवर दोन व त्यापेक्षा अधिक रिक्षा चालवण्याचे प्रकार ठाणे शहरामध्ये घडत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत ठाणे शहरात साडेचार हजार अनधिकृत रिक्षा चालविल्या जात असतांना रिक्षा पडताळणीबाबत प्रादेशिक परिवहन कार्यालयाची अनावस्था झाली असून रिक्षांच्या परमिटची कुठलीही तपासणी होत नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद अप्पर तहसिल कार्यालयाच्या इमारतीची व परिसर नुतनीकरणाची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत

**(२०) * ३२१५६ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद अप्पर तहसिल कार्यालयाच्या इमारतीची व परिसर नुतनीकरणाची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याचे तसेच काही कामे अपूर्ण असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर प्रकरणी जबाबदार अधिकारी/ कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय,

तहसिलदार यांनी दिनांक २२/११/२०१६ रोजीच्या पत्रान्वये लेखी तक्रार केली आहे.

(२) सदर प्रकरणाच्या अनुषंगाने अधिक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण, औरंगाबाद यांना या प्रकरणी चौकशी करून अहवाल सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. चौकशीअंती जबाबदार अधिकारी/ कर्मचारी यांच्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वांद्रे (पुर्व) मुंबई येथील शासकीय वसाहतीच्या देखभाल व दुरुस्तीच्या कामात अपहार झाल्याबाबत

**(२१) * ३२६३७ श्री.सुभाष झांबड, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे (पूर्व) शासकीय कर्मचारी वसाहत (मुंबई) इमारतीची कामे न करताच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी खोटी देयके सादर करून रूपये १०० कोटीहून अधिक रक्कमेचा अपहार केल्याचे दिनांक १७ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार या प्रकरणातील संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, अंशत: खरे आहे.

वांद्रे (पूर्व) मुंबई येथील शासकीय वसाहतीच्या देखभाल व दुरुस्तीच्या कामांबाबत तक्रारवजा निवेदन मा.ना.श्री.रामदासजी आठवले यांनी दिनांक २१/१०/२०१४ अन्वये केलेले असून सदर तक्रारीच्या अनुषंगाने मंडळ स्तरावरुन गठीत केलेल्या चौकशी समितीने सन २०११-२०१२ ते २०१४-२०१५ मधील तक्रार प्रविष्ठ कामांची पहाणी/चौकशी केली असता चौकशीमधील कामांमध्ये काही त्रुटी व उणीवा एप्रिल, २०१७ पूर्वीच निदर्शनास आल्या आहेत.
(२) होय.

सदरील प्रकरणात चौकशी करण्यासाठी नेमलेल्या समितीच्या अहवालामध्ये काही कामासंदर्भात त्रूटी व उणीवा आढळून आल्या असून त्यात काही कामांमध्ये शासनाचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे.

चौकशी समितीने तक्रार प्रविष्ठ कामांची पाहणी करून सादर केलेल्या अहवालातील आढळून आलेल्या अनियमिततेच्या बाबींना जबाबदार असणा-या अधिकारी/ कर्मचारी यांच्याविरूध्दची प्रारूप दोषारोप पत्रे एकत्रित कार्यवाही करीता मुख्य अभियंता, सा.बां.प्रादेशिक विभाग यांच्यामार्फत शासनास प्राप्त झाली असून शासन स्तरावर दोषारोप पत्रे तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाढोणा (ता.आर्वी, जि.वर्धा) येथे वीज पडून मृत पावलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(२२) * ३३४६४ श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाढोणा (ता.आर्वी, जि.वर्धा) येथे दिनांक २ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसात वीज पडून दोन महिलांचा मृत्यू व काही शेतमजूर महिला जखमी झाल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मृत महिला शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना तसेच जखमी महिला शेतमजुरांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) होय.

दिनांक १ जून, २०१७ रोजी मौजे वाढोणा (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील वीज अंगावर पडून २ महिलांचा मृत्यू झाला आहे. तसेच ६ व्यक्ती जखमी झाल्या आहेत. या विभागाच्या दिनांक १३ मे, २०१५ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार २ मृत महिलांच्या वारसांना प्रत्येकी रुपये ४.०० लक्ष व ६ जखमी व्यक्तींना प्रत्येकी रुपये ४,३००/- इतकी आर्थिक मदत दिनांक ५ जुलै, २०१७ रोजी अदा करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्याकरीता केंद्र शासनाच्या आपत्ती निवारण निधीची मागणी करण्याबाबत

**(२३) * ३१७०९ श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामराव वडकुते, श्री.प्रकाश गजभिये, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे मे महिन्यात झालेला अवकाळी पाऊस, वारा व चक्रीवादळाने वित्त व जिवीत हानी झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुष्काळामुळे नुकसानग्रस्तांना मदत देण्याकरीता शासनाने सन २०१६-१७ च्या आर्थिक वर्षासाठी केंद्र शासनाच्या आपत्ती निवारण निधीची मागणी केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार नुकसानग्रस्तांना मदत देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

राज्यात माहे एप्रिल व मे, २०१६ व नोव्हेंबर, २०१६ मध्ये अवेळी पाऊस व गारपीट यामुळे झालेल्या शेतीपिकाच्या नुकसानाबाबत आपद्ग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत दिनांक २३ मे, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्णय घेण्यात आला आहे.

(२) व (३) केंद्र शासनाकडे निधी मागणीबाबतचा प्रस्ताव पाठविण्यासाठी सर्व क्षेत्रिय प्राधिकाऱ्यांकडून झालेल्या नुकसानाबाबतचे प्रस्ताव मागविण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील शेतकऱ्यांना पीक विमा योजनेच्या लाभापासून वंचित ठेवल्याबाबत**

**(२४) * ३०८८६ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.सुधीर तांबे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विमा कंपन्याच्या पीक विमा योजनेच्या अंमलबजावणीत अनियमितता झाल्याचे महालेखापरिक्षकाच्या (कॅग) अहवालात नमूद असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अहवालानुसार सन २०१४-१६ मध्ये वा त्यादरम्यान काही शेतकऱ्यांना पीक विमा योजनेपासून वंचित ठेवले तसेच कर्जदार शेतकऱ्यांचा योजनेत समावेश न करण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१४ पासून किती शेतकऱ्यांच्या पीक विम्याचे दावे नाकारलेल्या तक्रारी शासनास प्राप्त झाल्या व त्यातील किती तक्रारी विमा कंपनीकडे पाठविण्यात आल्या आहेत,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन पीक विमा योजनेच्या लाभापासून शेतकऱ्यांना वंचित ठेवलेल्या विमा कंपन्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) राष्ट्रीय कृषि विमा योजनेंतर्गत पिक विमा योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भात काही बाबी महालेखापरिक्षकांनी निदर्शनास आणलेल्या आहेत, हे खरे आहे.

(२) व (३) शेतकऱ्यांना पिक विमा योजनेपासून वंचित ठेवण्यात आलेले नाही. तसेच, कर्जदार शेतकऱ्यांचा पिक विमा योजनेत समावेश न करण्यात आल्याचेही निदर्शनास आलेले नाही. मात्र, राष्ट्रीय कृषि विमा योजना खरीप २०१४ व रब्बी हंगाम २०१४-१५ मध्ये ४८ बँकांअंतर्गत एकुण १६८६६ शेतकऱ्यांचे प्रस्ताव बँकांच्या चुकींमुळे विमा कंपनीस विहित कालावधीमध्ये प्राप्त न झाल्यामुळे सदर शेतकरी योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्याने निदर्शनास आलेले आहे. सदर शेतकऱ्यांना संबंधीत बँकेने नुकसान भरपाई देणेबाबत केंद्र शासनाने गठित केलेल्या समितीने आदेशित केलेले आहे. त्यानुषंगाने आयुक्त (कृषि), पुणे यांच्या मार्फत संबंधित बँकाकडे पाठपुरावा चालू आहे.

(४) बँकस्तरावरील त्रुटीमुळे पिक विमा योजनेंतर्गत खरीप व रब्बी हंगाम २०१४-१५ मध्ये शेतकरी पिक विमा योजनेच्या लाभापासून वंचित राहिले होते. बँकांमार्फत विमा कंपनीस विहित कालावधी नंतर प्राप्त झालेले विमा प्रस्ताव योजनेच्या तरतुदीनुसार राज्य शासनाचे शिफारसीनुसार भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत केंद्र शासनाकडे पाठविण्यात आलेले होते. त्याबाबत केंद्र शासन स्तरावर स्थापन करण्यात आलेल्या समितीची बैठक झाली असून यामध्ये १६८६६ पात्र शेतकऱ्यांना रुपये ११.५४ कोटी नुकसान भरपाई देणेबाबत निर्णय झाला आहे. बँक ऑफ बडोदा, अमरावती, शाखा माजिर मसला, विदर्भ कोकण ग्रामीण बँक, नागपूर, शाखा पालंदुर, भंडारा, आंध्रा बँक, परभणी व विदर्भ कोकण ग्रामीण बँक, नागपूर, शाखा तालोडी या ४ बँकांकडून झालेल्या विमा प्रस्तावांमधील त्रुटी क्षम्य ठरवून देय नुकसान भरपाई रुपये २२.३७ लाख भारतीय कृषि विमा कंपनीने शेतकऱ्यांना देणेबाबत समितीने सुचित केले आहे. मात्र उर्वरित ४४ बँकांकडील रुपये ११.३२ कोटी नुकसान भरपाई शेतकऱ्यांना अदा करावयाची संपूर्ण जबाबदारी ही संबंधीत बँकेची राहणार असून त्याबाबत सर्व बँकांना आयुक्त (कृषि) यांच्यामार्फत आदेश देण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील कोतवालांप्रमाणे इतर मानधनावर असलेल्या कर्मचाऱ्यांकरीता "एकछत्र योजना" तयार करण्याबाबत

**(२५) * ३२६३९ प्रा.जोगेन्द्र कवाडे : तारांकित प्रश्न क्रमांक २९४४१ ला दिनांक ३१ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कोतवालांप्रमाणे इतर मानधनावर असलेल्या कर्मचाऱ्यांचा एकत्रित विचार करुन त्यांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी त्यांच्याकरीता "एकछत्र योजना" तयार करण्याकामी अभ्यास करुन शासनास शिफारस करण्यासाठी अप्पर मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली एक सचिव समितीची स्थापना करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, प्राप्त अहवालानुसार चतुर्थश्रेणी दर्जा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) राज्यातील कोतवालांप्रमाणे "पोलीस पाटील", "आशा वर्कर्स" व "अंगणवाडी सेविका" या व अशा मानधनावर असलेल्या अन्य कर्मचाऱ्यांचा एकत्रित विचार करुन त्यांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी "एकछत्र योजना" तयार करण्याकामी शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. बैठक-२०१६/प्र.क्र.५८१/ई-१०, दिनांक १८ मार्च, २०१७ अन्वये अपर मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली सचिव समिती गठीत करण्यात आली असून सदर समितीचा अहवाल प्राप्त व्हावयाचा आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई-गोवा महामार्ग चौपदरीकरणाबाबत

**(२६) * ३१४६३ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, ॲड.अनिल परब, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.रविंद्र फाटक, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग : तारांकित प्रश्न क्रमांक २९३६० ला दिनांक १७ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने मुंबई-गोवा महामार्गाचे चौपदरीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या महामार्गाकरीता भूसंपादन प्रक्रिया करण्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे, आतापर्यंत महामार्गाकरीता किती जमीन संपादित करण्यात आली आहे, सदरहू कामाकरीता किती निधी खर्च करण्यात आला आहे, चौपदीकरीकरणाचे काम केव्हापर्यत पूर्ण होणे अपेक्षित आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू महामार्गाचे चौपदीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे.
(२) व (३) भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडून पनवेल ते इंदापूर ह्या ८४ कि.मी. रस्त्याचे चौपदरीकरण खाजगीकरणामधून प्रगतीत असून चौपदरीकरणासाठी २१७ हे. भूसंपादन करण्यात येत असून त्यापैकी २०३ हे. भूसंपादनाचे रुपये ४५१.९८ कोटी रकमेचे निवाडे घोषित झाले असून त्यापैकी रुपये ३८५.५७ कोटी मावेजा वाटप पूर्ण करण्यात आले आहे. चौपदरीकरणाचे काम मे २०१८ अखेर पूर्ण होणे अपेक्षित असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पनवेल यांनी कळवले आहे.

इंदापूर ते झाराप ह्या ३६६.२७ कि.मी. रस्त्याचे चौपदरीकरणासाठी १८९ गावांमध्ये ८९१.९५ हे. भूसंपादन करण्यात येत असून त्यापैकी १८२ गावांमधील ७३७.५५ हे. भूसंपादनाचे रुपये ३८९२.५५ कोटी निवाडे घोषित झाले असून त्यापैकी रुपये २४८६.४३ कोटी रक्कम भूसंपादन अधिकाऱ्यांकडे जमा केली असून त्यापैकी रुपये ८०५.४० कोटी मावेजा वाटप करण्यात आले आहे. ह्या भागातील चौपदरीकरणाचे काम १० पॅकेजमध्ये हाती घेतले असून ८० टक्के भूसंपादन झाल्यानंतर प्रत्यक्ष बांधकामास सुरुवात होणार आहे. सर्वसाधारणपणे मे, २०१९ मध्ये चौपदरीकरणाचे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यातील अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्याबाबत

**(२७) * ३३१०४ श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंगरकडा, जवळा, पांचाळ, सुकळी, भाटेगांव, जामगव्हाण, हिवरा, वरुड (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) या गावांमध्ये दिनांक २६ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे शेतकऱ्यांच्या केळीबागा उध्दवस्त होऊन लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्याबाबत शेतकरी वर्ग, सामाजिक कार्यकर्ते तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्याकडे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना मदत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) होय.

(३) अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे शेतीपिकांची नुकसानभरपाई देण्यासाठी, झालेल्या नुकसानीची आकडेवारी क्षेत्रिय कार्यालयांकडून अचूक पंचनामे करुन मागविण्यात आली आहे. सदर माहिती संकलित करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उस्मानाबाद जिल्ह्यात अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या नुकसानग्रस्तांना मदत देण्याबाबत

**(२८) * ३२४२९ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यात अवकाळी पावसाने फळबागांचे नुकसान झाल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील : (**१) व (२) उस्मानाबाद जिल्ह्यात दिनांक १५ मार्च,२०१७ रोजी झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतीपिके/फळपिकांचे नुकसान झाले आहे. राज्यात माहे मार्च, २०१७ मध्ये झालेल्या अवकाळी पाऊस व गारपीट यामुळे झालेल्या शेतीपिके/फळपिकांच्या नुकसानाबाबत आपद्ग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबतचा निर्णय दिनांक ०६ मे,२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**माळशिरस (जि.सोलापूर) तालुक्यात शेती महामंडळ पूर्ववत सुरू करण्याबाबत**

**(२९) * ३२४४६ श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माळशिरस (जि.सोलापूर) तालुक्यातील शासनाच्या शेती महामंडळाची सुमारे चार हजार एकर जमीन मागील ९ वर्षापासून पडीक असून त्याठिकाणी झाडेझुडपे व बाभळी वाढल्या असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याशिवाय शासनाने येथे ९ वर्षापासून पीक योजना बंद केल्याने आणि ८० टक्के कामगार सेवानिवृत्त झाल्यामुळे येथे बेरोजगारीचे प्रमाण वाढून अनेक कुटूंबानी स्थलांतर केले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार यासंदर्भात निर्णय घेवून या भागात पुन्हा शेती महामंडळ पूर्ववत सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ सातत्याने आर्थिक तोट्यात असल्यामुळे सन २००८-०९ पासुन शेती महामंडळाची पिक योजना बंद करण्यात आली आहे. सोलापुर जिल्हयातील माळशिरस तालुक्यात महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाचे तीन शेत मळे असुन सदर मळयातील पात्र माजी खंडकऱ्यांना अनुज्ञेय क्षेत्राचे वाटप केल्यानंतर शिल्लक राहीलेल्या क्षेत्रापैकी काही क्षेत्र संयुक्त शेतीकरीता कराराव्दारे देण्यात आले आहे. उर्वरित क्षेत्र संयुक्त शेतीकरीता कराराव्दारे देण्याची कार्यवाही सुरू आहे. जे क्षेत्र संयुक्त शेती करीता अदयाप कराराव्दारे देण्यात आले नाही त्यावर थोडया प्रमाणात झाडेझुडपे व वेडया बाभळी वाढलेल्या आहेत.

महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची पिक योजना बंद केली असली तरी सर्व मळयांवरील लिपिक श्रेणी-१ ते अकुशल वर्गवारीतील कर्मचारी व कायम कामगार सध्या कार्यरत आहेत. तसेच महाराष्ट्र राज्य शेती महामंडळातील नियत वयोमानाने सेवानिवृत्त झालेल्या सर्व कर्मचारी व कायम कामगार यांना कायदेशीर देय असलेल्या सर्व रक्कमा प्रदान करण्यात आलेल्या आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## उद्योगांना भाडे पट्ट्याने किंवा कब्जे हक्काने शासनाने दिलेल्या जमिनीचे निवासी वापरासाठी रुपांतरीत करण्याबाबत

**(३०) * ३१५७३ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण क्षेत्रासह पुणे, नाशिक व अन्य मोठ्या शहरांमध्ये उद्योगांना भाडे पट्ट्याने (लिज) किंवा कब्जे हक्काने शासनाने दिलेल्या जमिनी निवासी वापरासाठी रुपांतरीत करण्यास परवानगी देण्याचा निर्णय महसूल विभागाने घेतल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयाचे स्वरूप काय आहे व शासनाने भूसंपादन करुन उद्योगांना जमीन दिली असेल तर त्याचा मात्र निवासी किंवा अन्य कारणासाठी वापर करता येणार नाही अशीही निर्णयात तरतूद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निर्णयानुसार आतापर्यंत उद्योगांना भाडे पट्ट्याने किंवा कब्जे हक्काने शासनाने दिलेल्या जमिनीचे निवासी वापरासाठी रुपांतरीत किती प्रकरणांना शासनाने मंजूरी दिली आहे, या निर्णयाचा फायदा किती उद्योगपती व कोणत्या विकासकांना झाला आहे व त्यातून किती गृह बांधणीला चालना मिळालेली आहे,

(४) असल्यास, शासन निर्णयानुसार आतापर्यंत उद्योगांना भाडेपट्टयाने किंवा कब्जे हक्काने शासनाने दिलेल्या जमिनीचे निवासी वापरासाठी रुपांतरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, किती प्रकरणांना शासनाने मंजूरी दिली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) नझूल जमीन वगळता, औद्योगिक प्रयोजनासाठी मंजूर केलेल्या शासकीय जमिनीचा वापर त्या प्रयोजनाऐवजी अन्य प्रयोजनासाठी करण्यास परवानगी देताना आकारावयाच्या अधिमूल्याबाबत शासनाने शासन निर्णय क्र: जमीन-०१/२०१३/प्र.क्र.२६/ज-१, दि. १५ एप्रिल, २०१७ अन्वये धोरणात्मक निर्णय घेतला आहे.

सदर धोरणात्मक निर्णय शासनाकडून भूसंपादन अधिनियमान्वये जमीन संपादित करून औद्योगिक घटकांना दिली आहे, अशा औद्योगिक घटकांच्या जमिनीबाबत लागू नाही.

या निर्णयानुसार अशा वापरातील बदलाचे प्रस्ताव सक्षम प्राधिकाऱ्याकडे अद्याप प्राप्त झालेले नसल्याने मंजूरी देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य परिवहन कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबत

**(३१) * ३१४८८ श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.सुनिल तटकरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.प्रकाश गजभिये : तारांकित प्रश्न क्रमांक २९१२९ ला दिनांक १० मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य परिवहन मार्ग महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीचा प्रस्ताव मागील एकवर्षा पासून शासनाकडे प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात मा.परिवहन मंत्री यांनी दिनांक ३० एप्रिल, २०१७ पर्यंत निर्णय घेण्याचे आदेश महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाला देवूनही याबाबत कोणताही निर्णय घेण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वेतन करारासाठी महामंडळ आणि मान्यता प्राप्त एसटी कामगार संघटनेमध्ये आतापर्यंत ७ वेळा बैठका होऊनही अद्यापपर्यंत आर्थिक मागण्यांवर कोणताच निर्णय झाला नसल्याचे आढळून आले, हे ही खरे आहे काय ?

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वेतन करार करुन कर्मचाऱ्यांना आर्थिक लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) नाही.

(२), (३) व (४) राज्य परिवहन महामंडळात महाराष्ट्र एस.टी.कामगार संघटना ही मान्यताप्राप्त संघटना असून, या संघटनेबरोबर दर चार वर्षांनी कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्त्याबाबत कामगार करार केला जातो.

सन २०१२-२०१६ चा कामगार करार संपल्यानंतर पुढील सन २०१६-२०२० या कामगार करारासाठी संघटनेने दिलेल्या मागण्यांबाबत मान्यताप्राप्त संघटने समवेत वाटाघाटी चर्चाधीन असल्याने २५% अंतरीम वाढ देणे संयुक्तिक ठरत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठांतर्गत असलेल्या कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(३२) * ३३६६० श्री.गोपिकिशन बाजोरीया : तारांकित प्रश्न क्रमांक २९३३० ला दिनांक १७ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतकऱ्यांना कृषी अडचणीविषयक अचूक माहिती व शंकाच्या निरसनासाठी राज्यात कृषी विज्ञान केंद्राची (केव्हीके) स्थापना करण्यात आली असून डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठांतर्गत असलेल्या सात कृषी विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञ, कर्मचाऱ्यांची ८० टक्के पदे रिक्त असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी विज्ञान केंद्रातील कर्मचाऱ्यांचे वेतनही थकित असून रिक्त पदांमुळे अपुऱ्या कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण वाढत असून शेतकऱ्यांना अद्ययावत माहिती मिळत नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य दुग्ध विकास महामंडळाच्या ताब्यातील (जि.पालघर) दापचारी प्रकल्पाच्या जागेच्या हस्तांतरणाबाबत

**(३३) * ३३१५० श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य दुग्ध विकास महामंडळाच्या ताब्यातील (जि.पालघर) दापचारी प्रकल्पाची साडेसहा हजार एकर जागा एमआयडीसीला हस्तांतरीत करण्याची प्रक्रिया शासनाने सुरू केली असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दापचारी येथे दुभत्या जनावरांचे संगोपन व चारा देखभालासाठी १३८० दशलक्ष लीटर्स क्षमतेचे स्वतंत्र धरण असतांनाही दुग्ध व्यवसाय शासनाच्या नियोजनाअभावी बंद होण्याच्या स्थितीत मार्गावर असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पाची हजारो एकर जमीन उद्योग विभागाला हस्तांतरीत करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

दापचरी प्रकल्पामधील साडेसहा हजार एकर जागेची एमआयडीसीकडून मागणी करण्यात आलेली नसून केवळ ८६० हेक्टर जमीन मिळण्याबाबत उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडून मागणी करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

या विभागांतर्गत असलेल्या आरे व पालघर सह दापचरी येथील गोशाळा योजना शासन निर्णय दिनांक ३० जून, २००० अन्वये बंद करण्यात आलेली आहे. दापचरी येथे दुग्धव्यवसाय कृषीक्षेत्र योजना सध्या चालु आहे. सदर योजनेंतर्गत १९७ कृषीक्षेत्र धारकांकडून दुधाचा पुरवठा दापचरी येथील शासकीय दूध शितकरण केंद्रास होत असून दुग्ध व्यवसाय चालु आहे.

(३) दापचरी प्रकल्पाची जमीन उद्योग विभागाकडे अद्याप हस्तांतरीत करण्यात आलेली नाही.

(४) वरील वस्तुस्थिती विचारात घेता चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य परिवहन महामंडळाच्या बस स्थानकांवर स्वस्त औषधे (जेनेरिक औषध) दुकाने उपलब्ध करून देण्याबाबत

**(३४) * ३१०६० डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २९०२६ ला दिनांक १७ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने राज्य परिवहन महामंडळाच्या ५९७ बसस्थानकात गरजु रुग्णांना स्वस्त औषधे (जेनेरिक औषध) उपलब्ध करून देण्याच्या निर्णयाच्या अनुषंगाने संबंधित बसस्थानकात जेनेरिक औषध विक्री सुरु करण्याकरिता निविदा मागविण्यासंबंधीची कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, किती बसस्थानकात जेनेरिक औषध विक्री सुरु करण्यात आली आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून बसस्थानकात जेनेरिक औषध विक्री सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१), (२) व (३) राज्य परिवहन महामंडळाच्या बसस्थानकांवर जेनेरिक औषध विक्री केंद्रे चालू करण्यासाठी महामंडळाद्वारे निविदा मागविण्याची कार्यवाही अद्याप पूर्ण झालेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शासनाने १० किलोमीटर लांबीच्या रस्त्यांच्या देखभालीचा कंत्राट दोन वर्षासाठी देण्याचा निर्णय घेतल्याबाबत**

**(३५) * ३११३९ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने १० किलोमीटर लांबीच्या रस्त्यांच्या देखभालीचा कंत्राट दोन वर्षासाठी देण्याचा निर्णय दिनांक ४ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयात दहा किलोमीटर पेक्षा कमी लांबीच्या रस्त्यांना कंत्राट दिला जावू नये अशी अट घातल्यामुळे लहान कंत्राटदार बेरोजगार होत असल्याने काही संघटनांनी सदर निर्णय बदलण्याबाबतची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) अशी तक्रार प्राप्त नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महाड (जि. रायगड) तालुक्यातील सावित्री नदीमधील**
**अवैध वाळू उत्खनन रोखण्याबाबत**

**(३६) * ३०९८२ ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक १५९५३ ला दिनांक २१ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) तालुक्यातील सावित्री नदीमध्ये शासनाने केवळ हातपाटीद्वारे वाळू उत्खनन करण्यास परवानगी दिली असून वाळू उत्खनन करण्याकरिता १८ बोटींना वाहतूक करण्याचा परवाना दिला असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सावित्री नदीमध्ये सेक्शन पंपाद्वारे अवैधरित्या वाळू उत्खनन केल्याने शासनाचा महसुल बुडविला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार अवैध वाळू उत्खनन रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) शासन निर्णय दि.२१/०५/२०१५ मधील तरतूदींनूसार जिल्हाधिकारी रायगड यांनी सन २०१६-१७ साठी महाड तालुक्यातील सावित्री नदीक्षेत्रात हातपाटीद्वारे वाळू उत्खनन करण्यासाठी व असे उत्खनन केलेली वाळू किनाऱ्यापर्यंत अयांत्रिक बोटी/होडीद्वारे वाहून नेण्यासाठी परवाने दिले आहेत. तथापि, सदर क्षेत्रातून वाळूचे उत्खनन करण्यासाठी यांत्रिक बोटींना परवाना दिला असल्याचे माहे मे, २०१६ वा त्यादरम्यान निदर्शनास आलेले नाही.

(२) व (३) रायगड जिल्ह्यात गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुक रोखण्यासाठी उपविभागीय व तहसील स्तरावर महसूल विभाग, पोलीस विभाग व महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांचे कर्मचारी यांचा समावेश असलेली तपासणी पथके गठित करण्यात आली आहेत. माहे एप्रिल, २०१६ ते माहे जून, २०१७ या कालावधीदरम्यान सदर तपासणी पथकांमार्फत सावित्री नदीक्षेत्रातील वाळूच्या अवैध उत्खनन व वाहतुकीच्या ४७ प्रकरणांमध्ये वेळोवेळी कारवाई करून, रुपये ५४,५२,४०१/- एवढा दंड वसूल करून शासनजमा केलेला आहे. तसेच २ गुन्हे दाखल करण्यात आले असून ८ सक्शन पंप, ४ बोटी व ७ कुंड्या नष्ट करण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बीड जिल्हयातील शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम वाटप करण्याबाबत**

**(३७) * ३३२१६ श्री.विनायकराव मेटे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयवंतराव जाधव, श्री.विक्रम काळे, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्हयातील शेतकऱ्यांना खरीप व रब्बी पिकांची पीक विम्याची मंजुर झालेली रक्कम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने शेतकऱ्यांना वाटप केली नसल्याचे दिनांक १० जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खरीप व रब्बी पिकांची पिक विम्याची किती रक्कम मंजुर झाली आहे, पीक विम्याची रक्कम शेतकऱ्यांना वाटप न करण्याचे कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पीक विम्याची रक्कम शेतकऱ्यांना वाटप करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१), (२) व (३) राष्ट्रीय कृषि विमा योजना रब्बी हंगाम २०१५-१६ मध्ये ४.३४ लाख शेतकऱ्यांसाठी नुकसान भरपाई रक्कम रुपये २२५.१२ कोटी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक बीड यांना भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत प्राप्त झाली. त्याचप्रमाणे प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप २०१६ अंतर्गत ३.७८ लाख शेतकऱ्यांसाठी नुकसान भरपाई रक्कम रुपये १२०.०४ कोटी एच.डी.एफ.सी.इर्गो या विमा कंपनीमार्फत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक बीड यांना प्राप्त झाली आहे.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक बीड यांचे मार्फत सदरची पिक विमा नुकसान भरपाई रक्कम संबंधीत लाभार्थीच्या बचत खात्यात वर्ग करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वाशी (नवी मुंबई) येथील जेट्टीची दुरवस्था झाल्याबाबत**

**(३८) * ३१०२७ आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशी (नवी मुंबई) येथील सर्वात जुनी जेट्टीची दुरवस्था झाल्याने मच्छिमारांना जेट्टीअभावी त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार निधी उभारून जेट्टीची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अरूणावती नदी ते आंतरगा (जि.यवतमाळ) जोड रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत**

**(३९) * ३२१११ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, अॅड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्णी आंतरगांव (जि.यवतमाळ) रस्त्यावरील अरुणावती नदीवरील पुलापासून ते अंतरगाव या जोड रस्त्याचे काम अपूर्ण आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) होय.

(३) व (४) होय.

विषयांकित पूलापासून अंतरगाव पर्यंत रस्त्याचे कामाकरीता काही लांबीचे भूसंपादन करुन बांधकाम करणे व काही लांबीचे खडीकरण करणे आवश्यक आहे. उक्त पूलापासून अंतरगाव पर्यंतचा रस्ता इजिमा दर्जाचा असल्याने याबाबत ग्राम विकास विभागाकडून कार्यवाही होणे अपेक्षित आहे. त्यासंदर्भात कार्यवाही करण्याकरीता ग्रामविकास विभागास विनंती करण्यात आली आहे.

----------------

## मंडणगड (जि.रत्नागिरी) बसस्थानकाची दुरवस्था झाल्याबाबत

**(४०) * ३२४११ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंडणगड (जि.रत्नागिरी) बसस्थानकात गाड्या भंगार झाल्या असून बसस्थानकाच्या आवारातील सांडपाण्यामुळे दुर्गंधी, पिण्याच्या पाण्याची समस्या, कमी मनुष्यबळ व वाढत्या तोट्यामुळे बसस्थानकाची दुरवस्था झाल्याचे दिनांक १८ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार मंडणगड बसस्थानकात सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) नाही.

(२) राज्य परिवहन महामंडळाद्वारे मंडणगड येथे सन १९७८ मध्ये बसस्थानक बांधण्यात आले असून, सदर बसस्थानकामध्ये वाहतूक नियंत्रण कक्ष, उपहारगृह, प्रसाधनगृह, पिण्याचे पाणी इ. सुविधा असून, बसस्थानकाची व प्रसाधनगृहाची स्वच्छता नियमित केली जाते.

मंडणगड आगारात सद्यस्थितीत ४३ बसेस उपलब्ध असून, सदर गाडयांचे सरासरी आयुर्मान ५.१८ वर्षे इतके आहे. सन २०१४ ते २०१७ मध्ये मंडणगड आगारास ६ नवीन बसेस देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## मौजे सारसन आणि मौजे ठाणेन्हावे (ता.खालापुर, जि.रायगड) येथील ट्रक टर्मिनलच्या निविदेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४१) * ३०९१४ श्री.नारायण राणे, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर मौजे सारसन आणि मौजे ठाणेन्हावे (ता.खालापुर, जि.रायगड) येथील ट्रक टर्मिनलच्या नावाने महाराष्ट्र राज्य रस्ते

विकास महामंडळाने काढलेल्या निविदेत गैरव्यवहार झाला असून निविदा प्राप्त करणाऱ्या धारकांनी खाजगी कंपन्यांचे अनुभव प्रमाणपत्रे व बोगस नेटवर्क प्रमाणपत्र सादर केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून पेट्रोलपंप आणि फूड मॉलसाठी देण्यात आलेल्या भूखंड वाटपात गैरव्यवहार झाल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अपात्र निविदाकारांना सदरहू निविदा मंजूर केल्यामुळे शासनाचे रूपये २००० कोटींचे नुकसान झाले असल्यामुळे याबाबत महालेखापाल यांनी आक्षेप घेतला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) सदर विषयासंदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत दिनांक २३/०२/२०१७ रोजी चौकशी समिती नियुक्त करण्यात आली असून समिती त्याबाबत चौकशी करीत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) महालेखापाल कार्यालयाने निविदाकारांबाबत, त्यांच्या पात्रतेबाबत, अनुभवाबाबत व निविदेतील अटी, शर्ती व इतर बाबींबाबत काही आक्षेप उपस्थित केले होते. या आक्षेपाच्या अनुषंगाने महामंडळाकडून आक्षेपांच्या निराकरणाबाबत अहवाल महालेखापाल कार्यालयास सादर केला आहे.

(४) व (५) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळातर्फे दिनांक २३/०२/२०१७ रोजी चौकशी समिती नियुक्त केली असून चौकशी सुरु आहे.

-----------------

**गोडउमरी (ता.साकोली, जि.भंडारा) येथे अनधिकृतरित्या विट भट्ट्या सुरू असल्याबाबत**

**(४२) * ३२९६७ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोडउमरी (ता.साकोली, जि.भंडारा) येथे अनेक ठिकाणी शासनास रॉयल्टी न भरता शासकीय अधिकाऱ्यांशी संगनमताने अनधिकृतरित्या विट भट्टी सुरू असल्याचे माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनधिकृतपणे सुरू असलेल्या विट भट्ट्यांमुळे त्याचा स्थानिक नागरिकांना त्रास होत असून याबाबत स्थानिक नागरिकांनी अनेकवेळा संबधित अधिका-यांकडे लेखी तक्रार करुनही कोणतीच कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) या बाबी निदर्शनास आल्या नाहीत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुद्रांक शुल्कात केलेल्या वाढीसंदर्भातील निर्णय रद्द करण्याबाबत**

**(४३) * ३०९३० श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागरी भागातील स्थावर मालमत्तेच्या अभिहस्तांतरणसाठी (डिम्ड कन्व्हेंअन्स) पाच टक्के, ग्रामीण भागात चार टक्के तसेच बक्षीसपात्र दस्त नोंदणीवर तीन टक्के मुद्रांक शुल्कात वाढ करण्याचा निर्णय शासनाने दिनांक १७ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरी तसेच ग्रामीण भागांमध्ये अभिहस्तांतरणावर मुद्रांक आकारण्याच्या निर्णयाने इमारतीमध्ये राहणाऱ्या लाखो सर्वसामान्य नागरिकांना आर्थिक भूर्दंड बसणार असल्याने सदरील निर्णय रद्द करण्याची मागणी सर्वस्तरातून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुद्रांक शुल्कात केलेल्या वाढीसंदर्भातील निर्णय रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.
(२) असे निदर्शनास आले नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### महाड व पोलादपूर (जि.रायगड) तालुक्यातील डोंगरपायथ्याशी वसलेल्या गावांच्या सुरक्षिततेबाबत

**(४४) * ३३३९४ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड व पोलादपूर (जि.रायगड) तालुक्यासह ८४ गावांवर यावर्षीच्या पावसाळ्यात दरड कोसळण्याची भिती भूवैज्ञानिक आणि भूजल सर्वेक्षण विभागाने आपल्या अहवालात नमूद केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार रायगड जिल्ह्यातील डोंगरपायथ्याशी वसलेल्या गावांच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) मान्सून कालावधीमध्ये अतिवृष्टीच्या काळात संभाव्य दरडग्रस्त गावांतील नागरिकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करण्याच्या सूचना क्षेत्रिय कार्यालयाकडून देण्यात येतात.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

### लोढा विकासक (मुंबई) यांनी वडाळा (पूर्व) मुंबई येथील व्यावसायिक इमारतीचे मुद्रांक शुल्क थकविल्याबाबत

**(४५) * ३२१०२ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोढा विकासक (मुंबई) यांनी मुंबईतील वडाळा पूर्व येथे “न्यु कफ परेड“ नावाच्या निवासी आणि व्यावसायिक इमारतीचे रूपये ५,७२७ कोटींच्या जमीन खरेदीवरील मुद्रांक शुल्क न भरल्याने जिल्हाधिकारी, मुंबई आणि मुद्रांक शुल्क विभागाने माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान नोटीस बजावली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने लोढा विकासकाकडून मुद्रांक शुल्क वसुल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) होय, उक्त जमिनीसंदर्भात मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण व मे.लोढा क्राऊन बिल्डमार्ट प्रा.लि.यांच्यातील भाडेपट्टा करारांतर्गत मोबदला रक्कम रुपये ५७२१ कोटी ३३ लक्ष या रकमेवर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या तरतूदींनुसार देय असलेले मुद्रांक शुल्क व शास्ती भरण्याबाबत दिनांक २८/०४/२०१७ रोजी आदेश जारी करण्यात आले असून त्याप्रमाणे वसूलीची कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ढेबेवाडी (जि.सातारा) येथील पुशवैद्यकीय दवाखाना इतर ठिकाणी स्थलांतरीत करण्याबाबत**

**(४६) * ३१०३३ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ढेबेवाडी (जि.सातारा) येथील ग्रामीण रुग्णालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थान बांधण्याकरीता पशुवैद्यकीय दवाखाना इतरत्र स्थलांतरीत करण्याचे आदेश सार्वजनिक बांधकाम विभागाने दिले असल्याचे दिनांक २९ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ढेबेवाडी खोऱ्यातील शेतकऱ्यांच्या सोयीसाठी जनावरांकरीता असलेला दवाखाना इतर ठिकाणी स्थलांतरीत केल्यास शेतकऱ्यांनी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.
(२) सदरचा पशुवैद्यकीय दवाखाना अन्यत्र हलविण्यात येऊ नये, अशी विनंती केली आहे.
(३) सदर पशुवैद्यकीय दवाखाना पर्यायी जागेची व्यवस्था होईपर्यंत सध्या असलेल्या ठिकाणी कार्यरत ठेवण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वांद्रे (मुंबई) पूर्वेकडील कालेकर रोडवरील जे.जे. वसतिगृहाची दुरवस्था झाल्याबाबत

**(४७) * ३२४४५ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे (मुंबई) पूर्वेकडील कालेकर रोडवरील जे.जे. वसतिगृह सन १९६० मध्ये बांधण्यात आले असून देखभाल, दुरूस्ती व निगराणी अभावी वसतिगृहाची दुरवस्था झाली असून शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई आणि जे.जे. आर्किटेक्ट कॉलेजमधील विद्यार्थी अशा परिस्थितीत या धोकादायक वसतिगृहात राहत असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार वसतिगृहाची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर इमारतीची उपभोक्ता विभाग प्रमुखांसमवेत संयुक्तरित्या पाहणी करुन वसतिगृहामधील विद्यार्थ्यांना, शासकीय वसाहत वांद्रे येथे सा.बां. विभागाच्या संक्रमण विश्रामगृहामध्ये (Transit Rest House) तात्पुरत्या स्वरूपात स्थलांतरीत करण्यात आलेले असून इमारतीचे संरचनात्मक दुरुस्ती व नूतनीकरणाचे रुपये ६.९८ कोटी रक्कमेचे अंदाजपत्रक उपभोक्ता विभागास प्रशासकिय मान्यता व निधी मिळणेसाठी सादर करण्यात येत आहे.

----------------

## येवला व निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील तलाठी व मंडळ अधिकारी कार्यालये-निवासस्थाने बांधण्याबाबत

**(४८) * ३१४३८ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २७१७७ ला दिनांक १० मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) तालुक्यातील ३० गावांमध्ये तसेच निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील १९ गावांमध्ये तलाठी व मंडळ अधिकारी कार्यालये-निवासस्थाने

बांधण्याकरिता अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी अनुक्रमे दिनांक २८ मार्च, २०१६ व दिनांक ८ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास विभागीय आयुक्त, नाशिक यांनी शासनाकडे सादर केलेल्या प्रस्तावातील अधिकची माहिती शासनास प्राप्त झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कार्यालये-निवासस्थाने बांधण्याकरिता आवश्यक निधी व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ ऑगस्ट, २०१६ रोजी व माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) येवला (जि. नाशिक) तालुक्यातील ३० गावांमध्ये तसेच निफाड (जि. नाशिक) तालुक्यातील १९ गावांमध्ये तलाठी व मंडळ अधिकारी कार्यालये-एवं-निवासस्थाने बांधण्याकरिता प्राप्त झालेल्या अंदाजपत्रकांबाबत विभागीय आयुक्त, नाशिक यांचेकडून अधिकची माहिती शासनास नुकतीच प्राप्त झाली आहे.

(२) होय हे खरे आहे.

(३) व (४) प्राप्त माहितीच्या अनुषंगाने प्रस्तावाची छाननी सुरू आहे.

----------------

## नागोठणे-पेण फाट्यावर बांधण्यात आलेल्या मोरीची उंची वाढविल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याबाबत

**(४९) * ३१५३१ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागोठणे-पेण फाट्यावर (जि.रायगड) मुंबई-गोवा महामार्गाच्या रुंदीकरणात नव्याने बांधण्यात आलेल्या मोरीची उंची वाढविण्यात आल्याने पावसाळ्यात शेतात साचणारे पाणी जाण्यासाठी जागा नसणे, त्यामुळे उन्हाळ्यात शेतात पाणी साचून राहिल्यामुळे शेतात शेत पीक घेता येत नसल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत सुप्रिम इन्फ्राट्रक्चर कंपनीच्या अधिकाऱ्यांना उक्त बाब निदर्शनास आणून देऊनही तसेच दोन वर्षापूर्वी तहसिलदार, रोहा यांना निवेदन देऊनही कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महामार्गात नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## मुंबईतील कोळीवाडे आणि गावठाणाच्या सीमांकनासाठी सर्वेक्षण करण्याबाबत

**(५०) * ३२२२३ ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कोळीवाडे आणि गावठाणाचे सर्वेक्षण करण्याचा निर्णय शासनाने माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) बृहन्मुंबई मधील कोळीवाड्यांचे प्रत्यक्ष सर्व्हेक्षण करुन सिमांकन करण्यासाठी अनुसरावी लागणारी कार्यपध्दती व त्यासंबधीची मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यासाठी महसूल व वन विभागाने दिनांक २०/११/२०१२ रोजी उपसंचालक भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली आहे. जुलै, २०१३ मध्ये प्राप्त सदर समितीच्या अहवालान्वये या विषयी अनुसरावी लागणारी कार्यपध्दती व त्यासंबधीची मार्गदर्शक तत्वे याबाबतच्या शिफारसी शासनास प्राप्त झाल्या आहेत. मात्र, समितीच्या अहवालात नमूद कोळीवाड्यांची संख्या व केंद्र शासनाकडून प्रसिध्द करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्याच्या सागरी मत्स्यव्यवसाय जनगणना, २०१० अहवालातील कोळीवाड्यांची संख्या यात फरक

असल्याने उपसंचालक भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई यांच्या नेतृत्वाखालील पथकाने प्रत्यक्ष स्थळपहाणी करण्याचे निर्देश दिनांक ०६/०४/२०१५ रोजी देण्यात आले. त्यानुसार बृहन्मुंबई क्षेत्रातील कोळीवाड्यांची प्रत्यक्ष स्थळ पहाणी करण्याची कार्यवाही सुरु आहे. यासंदर्भात मा. मंत्री (महसूल) यांच्याकडे मे, २०१७ मध्ये झालेल्या बैठकीतही बृहन्मुंबईतील कोळीवाड्यांच्या हद्दी निश्चित करण्याच्यादृष्टीने सर्व संबंधित प्राधिकरणांच्या प्रतिनिधींसह स्थळपहाणी करुन आवश्यक तो प्रस्ताव शासनास सादर करण्याच्या सूचना उपसंचालक भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई यांना देण्यात आल्या आहेत.

-----------------

**कोनगाव (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील अवैध रेती उपसा रोखण्याबाबत**

**(५१) * ३२८१९ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) तालुक्यातील कोनगाव आणि आसपासच्या परिसरात अवैधरित्या रेती उपसा सुरू असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रेती उपसा बंद न झाल्यास रास्ता रोकोसह आंदोलन करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार अवैध रेती उपसा रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) सरपंच ग्रामपंचायत कोन, ता. भिवंडी यांनी दिनांक १७/०५/२०१७ रोजी जिल्हाधिकारी ठाणे यांना उद्देशून लिहीलेल्या निवेदनान्वये, मौजे कोन/गोवे परिसरात सक्शनपंपाद्वारे रेतीचे अवैधपणे उत्खनन होत असून, सदरचा रेती उपसा बंद न झाल्यास रास्ता रोकोसारखे आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. तसेच मौजे कोनगाव व आजूबाजूच्या परिसरात रेतीचा अवैधपणे उपसा सुरू असल्याबाबतची बातमी दिनांक १८/०५/२०१७ रोजीच्या स्थानिक वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द झाली होती.

त्यानुषंगाने नायब तहसिलदार (महसूल), अपर मंडळ अधिकारी, भिवंडी व तलाठी सजा टेमघर यांनी मौजे कोन, गोवे व पिंपळास या गावच्या खाडी किनारी भेट देवून तपासणी केली असता, मौजे गोवे येथे रेतीचे अनधिकृत उत्खनन करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार संबंधितांवर

कोनगांव पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात येऊन सदर ठिकाणी अनधिकृत उत्खनन व वाहतुकीस प्रतिबंध करण्याकरीता खड्डे खोदून रस्ता बंद करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जालना जिल्ह्यातील पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांसह इतर रिक्त पदे भरणेबाबत**

**(५२) * ३२१८९ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे** : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यात राज्यस्तरीय ४५ आणि स्थानिक जिल्हा परिषदेचे ५९ असे पशुवैद्यकीय दवाखाने असून जिल्ह्यातील पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांसह इतर ८६ पदे रिक्त असल्याने जनावरांना औषध व उपचार मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांसह इतर रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) जालना जिल्हयात राज्यस्तरीय ४५ व स्थानिक स्तरीय ५९ असे एकूण १०४ पशुवैद्यकीय दवाखाने आहेत. राज्यस्तरीय एकूण मंजूर पदे १३९ असून त्यापैकी ८३ पदे रिक्त आहेत. तसेच स्थानिकस्तरावर एकूण १२७ मंजूर पदे असून त्यापैकी ३० पदे रिक्त आहेत. जालना जिल्हयात राज्यस्तरीय व स्थानिकस्तरीय दवाखान्यामध्ये वरील प्रमाणे पशुवैद्यकीय अधिकारी व इतर पदे रिक्त असली तरी सदर रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार हा शेजारील पशुवैद्यक अधिकारी/कर्मचारी यांचेकडे सोपवून पशुपालक धारकांच्या जनावरांना आरोग्य सेवा-सुविधा नियमित पुरविण्यात येत आहेत. त्यामुळे पदे रिक्त असल्याने जनावरांना आवश्यक उपचार मिळत नाहीत, अशी वस्तुस्थिती नाही.

(२) पशुधन विकास अधिकारी गट-अ या संवर्गाची रिक्त पदे भरण्याबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून दिनांक २६/०४/२०१७ रोजी एकूण १०० पदे भरण्यासाठी जाहीरात प्रसिध्द करण्यात आली असून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून दिनांक २४/०६/२०१७ रोजी लेखी परिक्षा घेण्यात आली आहे. आयोगाकडून पात्र उमेदवारांची यादी प्राप्त झाल्यानंतर जालना जिल्हयातील पशुधन विकास अधिकारी गट-अ यांची पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

पशुधन विकास अधिकारी गट-ब या संवर्गात रिक्त असलेली पदे पदोन्नतीने भरण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. त्याचप्रमाणे गट-क व गट-ड संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत नियुक्ती प्राधिकारी म्हणून आयुक्त पशुसंवर्धन यांच्यास्तरावर पुढील कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुरबाड (जि.ठाणे) तहसिल कार्यालयाच्या इमारतीवरुन उडी मारुन शेतकऱ्याने आत्महत्या केल्याबाबत

**(५३) * ३१२९४ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुरबाड (जि.ठाणे) तहसिल कार्यालयाच्या इमारतीवरुन उडी मारुन अशोक देसले या शेतकऱ्याने आत्महत्या केल्याची घटना दिनांक १० मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आपल्या हक्काची जमीन अन्य व्यक्तीच्या कब्जातून सोडविण्यासाठी तहसिल कार्यालयातून अनेकदा फेऱ्या मारूनही काम न झाल्याने त्रासाला कंटाळून या शेतकऱ्याने आत्महत्या केल्याचे निष्पन्न झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्याच्या मृत्यूस कारणीभूत असलेल्या तहसिलदार व संबंधित कर्मचाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) श्री.अशोक शंकर देसले या व्यक्तीचा दिनांक १०/०५/२०१७ रोजी सकाळी सुमारे ११.०० वाजता तहसिल कार्यालय, मुरबाड येथे आकस्मित मृत्यू झालेबाबत मुरबाड पोलीस, ठाणे येथे ए.डी.आर. क्र. १४/२०१७, दिनांक १०/०५/२०१७ अन्वये नोंद झाली असून त्याची चौकशी चालू आहे.

(३) व (४) श्री.देसले यांनी तहसिलदार, मुरबाड यांच्या कार्यालयात मौजे वनोटे, ता.मुरबाड, जि.ठाणे येथील स.नं. १६/४ हडप केल्याबद्दल अर्ज केला होता. मौजे वनोटे, ता.मुरबाड, जि.ठाणे येथील स.नं. १६/४ या जमिनीचा फेरफार क्रमांक ३०८, दिनांक ०८/०१/२०११ यामध्ये अनियमितता आढळल्याने संबंधित फेरफार नोंदविणारे तलाठी व मंडळ अधिकारी, तसेच मयत अर्जदार यांचे प्रकरण हाताळणारे कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही सुरु आहे.

तसेच, तत्कालीन तहसिलदार व नायब तहसिलदार (महसूल) यांची अन्यत्र बदली करण्यात आलेली आहे.

-----------------

## राज्य परिवहन मंडळातील भरती प्रक्रियेबाबत

**(५४) * ३२६६० प्रा.जोगेन्द्र कवाडे, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळात कर्मचाऱ्यांची कमतरता असून माहे मे, २०१७ मध्ये जवळपास १२६९ कर्मचारी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणारे असल्याने माहे जानेवारी, २०१७ मध्ये चालक, वाहक, लिपीक, टंकलेखक, सहाय्यक आणि पर्यवेक्षक अशा विविध १४ हजार २४७ पदांची भरती करण्याचा निर्णय राज्य परिवहन महामंडळाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य परिवहन महामंडळाच्या वेबसाईटवर अर्ज भरण्याची मुदत ११ फेब्रुवारीला संपली असून राज्य परिवहन महामंडळाकडून परीक्षेची तारीख अद्यापी जाहीर न झाल्यामुळे ज्या उमेदवारांनी अर्ज भरले आहेत त्यांच्यामध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, मोठ्या संख्येने कर्मचारी नियत वयोमानाने सेवानिवृत्त होत असतांना नवीन भरती प्रक्रिया लवकरात लवकर सुरु न केल्याने कामाच्या अतिरिक्त बोजामुळे महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी आंदोलन केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून राज्य परिवहन मंडळातील भरती प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) होय.

(२), (३) व (४) राज्य परिवहन महामंडळाच्या सरळसेवा भरती सन, २०१७ अंतर्गत पर्यवेक्षकीय व घटकसंवर्गीय पदांतील एकूण १४२५३ पदांसाठी जाहिरात देण्यात आली होती. उक्त जाहिरातीच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या उमेदवारांच्या अर्जांच्याआधारे चालक तथा वाहक पदाची लेखी परीक्षा दिनांक ०२/०७/२०१७ रोजी पार पडली असून सहाय्यक (कनिष्ठ) पदाची परीक्षा दिनांक ०९/०७/२०१७ रोजी आयोजित करण्यात आली आहे. उर्वरित पदांच्या परिक्षांचे आयोजन करण्याची बाब कार्यवाहीखाली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्हयातील काळू नदीवरील पूलाची दुरवस्था झाल्याबाबत

**(५५) * ३१५८६ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील काळू नदीवरील पूलाची दुरवस्था झाल्याने सदर पुलाची दुरुस्ती करण्याबाबतची मागणी स्थानिक ग्रामस्थांनी तसेच लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर पुलाची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) व (३) प्रश्नांकीत पूल शहापूर मुरबाड-कर्जत या रस्त्यांवर आहे. हा रस्ता केंद्र शासनाने राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८ म्हणून घोषित केला आहे. रस्ता केंद्र शासनाकडे हस्तांतरीत करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. या रस्त्याची सुधारणा करणे व प्रश्नांकीत पुलाचे ठिकाणी नवीन पूल बांधण्याचा प्रकल्प अहवाल तयार करण्याची कार्यवाही महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत प्रगतीत आहे.

प्रश्नांकीत पूल कमकुवत झाल्याने पूलावरुन वाहतूक बंद करण्यात आली आहे. सद्यस्थितीत वाहतूक अन्य पर्यायी मार्गाने वळवण्यात आली आहे.

या पूलाचे काम केंद्रशासनामार्फत हाती घेण्यात येणार असल्याने राज्य शासनामार्फत पुलाची दुरुस्ती /पुर्नबांधणी करण्याचे नियोजन नाही.

-----------------

**मुंबईतील वांद्रे-कुर्ला व्यापारी संकुलातील भूखंड बुलेट ट्रेन प्रकल्पास न देण्याबाबत**

**(५६) * ३१५७६ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे : तारांकित प्रश्न क्रमांक २७४८० ला दिनांक २२ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वांद्रे-कुर्ला व्यापारी संकुलातील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) च्या मालकीचा असलेला मोक्याचा भूखंड बुलेट ट्रेन प्रकल्पास दिल्यास या भूखंडाच्या विक्रीतून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) ला मिळणाऱ्या उत्पन्नातून विविध प्रकल्पांना निधी उपलब्ध करुन देणे, विविध महानगरपालिका, नगरपरिषदा यांना विकास कामासाठी कर्ज देणे, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) चा प्रशासकीय खर्च व कर्मचाऱ्यांचे वेतन देणे हे याच उत्पन्नातून भागविण्यात येत असल्यामुळे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) कडे शिल्लक असलेला २.५ हा भूखंड बुलेट ट्रेनसाठी देण्यात येऊ नये, अशी मागणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) च्या आयुक्तांनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) ची आर्थिक डबघाई लक्षात घेता सदर भूखंड बुलेट ट्रेन प्रकल्पास देण्यास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) ने विरोध दर्शविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईत सुरु करण्यात येणाऱ्या बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी मुंबईतील वांद्रे-कुर्ला व्यापारी संकुलातील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) च्या मालकीचा असलेला मोक्याचा भूखंड संपादित करण्यास शासनाने परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव राज्य मंत्रीमंडळापुढे सादर झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) साठी आर्थिक उत्पन्नाचा स्त्रोत असलेला हा भूखंड बुलेट ट्रेन प्रकल्पास न देण्याबाबत शासनाने निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) वांद्रे-कुर्ला संकुलातील प्राधिकरणाच्या मालकीचा भूखंड बुलेट ट्रेन टर्मिनससाठी देवू नये अशी विनंती मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दिनांक ०८/०७/२०१४ रोजीच्या पत्राने शासनास केली आहे.
(३), (४) व (५) मुंबई-अहमदाबाद जलद गती रेल्वे प्रकल्पासाठी बांद्रा-कुर्ला संकुलात ४.५ हेक्टर जमिनी खाली व ०.९ हेक्टर जमिनीवर जागा आवश्यक असल्याचे रेल्वेने दिनांक १०/११/२०१६ रोजी कळविले आहे. सदर ठिकाणी जागा अपेक्षित असलेल्या ५० हेक्टर क्षेत्राच्या भूखंडावर SEZ च्या धर्तीवर आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्र उभारण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने प्रस्तावित आहे. रेल्वे स्थानकाच्या बांधकामाचा विपरीत परिणाम आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्र प्रकल्पाच्या बांधकामावर होणार नाही या तसेच इतर सुयोग्य अटी व शर्तीवर सदर प्रकल्पाकरिता बीकेसी येथील ०.९ हेक्टर जमीन प्रस्तावित स्थानकाकरिता एमएमआरडीव्दारे उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव माहे जानेवारी, २०१७ मध्ये मंत्रिमंडळापुढे सादर करण्यात आला होता. सदर प्रकल्पाच्या मंत्रिमंडळास सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मुंबई अहमदाबाद जलद गती रेल्वे मार्ग उभारणीसाठी प्रस्तावाचा सखोल अभ्यास करण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमिती गठित करण्यात आली आहे.

-----------------

**राज्यातील जिल्हा विभाजन व नविन तहसिल कार्यालयाची निर्मिती करण्याबाबत**

**(५७) * ३३६६४ श्री.गोपिकिशन बाजोरीया, डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २७८४० ला दिनांक १० मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:**
सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा विभाजनाबाबत व नविन तहसिल कार्यालयाची निर्मिती करण्यासाठी निकष निश्चित करण्याकरिता अप्पर मुख्य सचिव (महसूल) यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून याबाबत कोणताही निर्णय घेण्यात आला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक जिल्ह्यातील वाढत्या लोकसंख्येमुळे नाशिक जिल्ह्याचे विभाजन करून मालेगांव जिल्हा निर्मिती करण्याबाबत तसेच, मालेगांव तहसिल कार्यालयाचे विभाजन करून नविन तहसिल कार्यालय निर्मिती करण्याबाबत निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, बोरगांव मंजू येथे स्वतंत्र तहसिलदारांची नियुक्ती करण्याबाबत तसेच, मौजे निमगांव (ता.मालेगांव, जि.नाशिक) येथे नविन अप्पर तहसिलदार कार्यालय सुरु करण्यात यावे, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ५ डिसेंबर, २०१६ रोजीच्या पत्रान्वये मा.महसूल मंत्री महोदयांकडे केली होती, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने तालुक्याचे विभाजनाचे निकष निश्चित करून नविन तालुका निर्मितीसंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) जिल्हा विभाजनाबाबत निकष निश्चित करण्याकरीता अप्पर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून तपासणीअंती धोरणात्मक निर्णय घेण्याची कार्यवाही सुरु आहे. मंत्रीमंडळाच्या मान्यतेने निश्चित केल्या जाणाऱ्या धोरणानुसार/निकषानुसार नाशिक जिल्ह्याचे तसेच अन्य जिल्ह्यांचे विभाजन/पुनर्रचने संदर्भात प्रकरणपरत्वे उचित निर्णय घेण्याचे योजिले आहे.

तालुका विभाजनाच्या अनुषंगाने निकष निश्चित करण्याबाबत विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झालेला आहे. प्राप्त अहवालातील शिफारशीच्या अनुषंगाने सर्व विभागीय आयुक्तांकडून मागविण्यात आलेले अभिप्राय प्राप्त झाले असून त्यांचा विचार करून तालुका विभाजनाचे निकष निश्चित करण्याकामी धोरण अंतिम करण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे. सदर धोरण निश्चित झाल्यानंतर प्रकरणपरत्वे नवीन तालुका निर्मितीसंदर्भात उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.
(३) व (४) तालुका विभाजनाचे निकष निश्चित करण्याकामी धोरण अंतिम करण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे. सदर धोरण निश्चित झाल्यानंतर बोरगांव मंजू येथे तसेच अन्यत्र नवीन तालुका निर्मितीसंदर्भात तसेच मौजे निमगांव ता. मालेगाव येथे अप्पर तहसिलदार कार्यालय स्थापन करण्यासंदर्भात उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील कृषी विद्यापीठातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(५८) * ३१०६१ डॉ.अपूर्व हिरे : दिनांक ३० मार्च, २०१७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ६ मधील प्रश्न क्रमांक २४४५५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील राहुरी, अकोला, परभणी व दापोली कृषी विद्यापीठात एकुण मंजुर पदांच्या ३४ टक्के (४४४१) पदे रिक्त असल्याच्या पार्श्वभुमीवर मा.मुख्यमंत्री महोदयांचे अध्यक्षतेखाली दिनांक १९ मे, २०१६ रोजी कृषी विभागाची आढावा बैठक संपन्न होवून या बैठकीत कृषी विद्यापीठांमधील रिक्त पदांचा आढावा घेण्यात आला असून उक्त बैठकीत मा.मुख्यमंत्री महोदयांनी कृषी विद्यापीठांतर्गत रिक्त पदांच्या (विशेषत्वः शिक्षक वर्गीय) ५० टक्के मर्यादेत पद भरतीस दर्शविलेल्या सहमतीस अनुसरून आवश्यक कार्यवाहीबाबत कृषी विद्यापीठाना सूचना देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त निदेशानुसार कृषी विद्यापीठातील रिक्त पदे भरण्याबाबत सुरू असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय, सदर रिक्त पदे भरण्याची कार्यवाही केव्हापर्यंत होणे अपेक्षित आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कृषी विद्यापीठातील रिक्त पदे भरण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) होय.

(२) नाही, सरळसेवेने भरावयाची पदे विद्यापीठ स्तरावरुन जाहिराती देवून भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच शिक्षकवर्गीय संवर्गातील पदे पदोन्नतीने भरावयाची कार्यवाही महाराष्ट्र कृषी विद्यापीठे सेवा प्रवेश मंडळ, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचेमार्फत सुरु आहे. सदर प्रक्रिया सुरु असताना काही न्यायालयीन प्रकरणे उद्भवली असल्याने पदभरती पुर्णत्वासाठी कालावधी लागण्याची शक्यता आहे.

(३) महाराष्ट्र कृषी विद्यापीठे अधिनियम १९८३ मधील कलम १८(१०) व परिनियम १९९० मधील परिनियम ७४ नुसार शिक्षकवर्गीय पदांसाठी कुलगुरु तसेच अधिनियम १९८३ मधील कलम १९(८) नुसार वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांबाबत कुलसचिव हे नियुक्ती प्राधिकारी आहेत. तद्नुषंगाने पदभरती प्रक्रियेसंबंधातील कार्यवाहीसाठी विद्यापीठ सक्षम प्राधिकारी आहे. सबब, शासन स्तरावरुन कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर-तुळजापूर या राष्ट्रीय महामार्गाकरीता यवतमाळ जिल्ह्यातील संपादीत केलेल्या जमिनीचा योग्य मोबदला देण्याबाबत

**(५९) * ३११४१ श्री.हरिसिंग राठोड : तारांकित प्रश्न क्रमांक २७१९२ ला दिनांक १७ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर-तुळजापूर या राष्ट्रीय महामार्गाच्या जमीन संपादनात यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या जमिनीला कमी मोबदला दिला असल्याचे माहे मे-जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिंगोली आणि नांदेड जिल्ह्यात प्रती चौरस मीटर तर यवतमाळ जिल्ह्यात प्रती हेक्टरी मोबदला दिला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्याच्या जमीन संपादन करतांना बाजारमूल्य, जमिनीचा पोत विचारात न घेता जमिनीचा मोबदला देत असल्याच्या तक्रारी शेतकऱ्याकडून करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार जमीन संपादनाचा योग्य मोबदला शेतकऱ्यांना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे,

(२) अंशत: खरे आहे,

हिंगोली व नांदेड जिल्ह्यात बाजारमूल्य दर तक्त्यानुसार जमिनीचे दर प्रति चौरस मीटर दराने निश्चित करण्यात आलेले आहेत. यवतमाळ जिल्ह्यात बाजारमूल्य दर तक्त्यानुसार प्रति हेक्टरी तसेच प्रति चौरस मीटर दर लक्षात घेऊन मोबदला निश्चित करण्यात येत आहे.

(३) होय.

बाजारमूल्य व जमिनीचा पोत विचारात न घेता जमिनीचा मोबदला देत असल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांकडून जिल्हाधिकारी यवतमाळ यांचेकडे प्राप्त झाल्या आहेत.

(४) भूसंपादनाचा मोबदला ठरविताना सदर गावातील मागील तीन वर्षातील खरेदी विक्री व्यवहार व बाजारमूल्य दर तक्त्यामध्ये दिलेले जमिनीचे दर यांचा तौलनिक विचार करण्यात येतो. मोबदला ठरविताना जिरायत, हंगामी, ओलित, बागायती, अकृषिक व संभाव्य अकृषिक क्षमता यासर्व बाबी लक्षात घेऊन जमिनीचा मोबदला देण्यात येतो. सद्यस्थितीत यवतमाळ जिल्ह्यामधील ५८ गावा पैकी फक्त ३ गावांचे निवाडे अंतिम स्तरावर असून राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून निधी प्राप्त न झाल्यामुळे ते सुध्दा अद्याप जाहिर करण्यात आलेले नाहीत.

त्यामुळे बाजारमूल्य व जमिनीचा पोत विचारात न घेता जमिनीचा मोबदला देत असल्याबाबत शेतकऱ्यांनी केलेल्या तक्रारी संयुक्तिक वाटत नाहीत.

तथापि, अर्जदारांना मोबदला मान्य नसल्यास राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ अंतर्गत अर्जदार लवादाकडे अपील करू शकतील अशी कायद्यात तरतूद आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## राज्यातील शेतकरी आत्महत्या रोखण्याबाबत

**(६०) * ३१११० आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.नारायण राणे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.विनायकराव मेटे, श्री.किरण पावसकर : तारांकित प्रश्न क्रमांक २६९४९ ला दिनांक १० मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:**

सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय गुन्हे माहिती संस्थेच्या (एनसीआरबी) प्रसिध्द झालेल्या अहवालानुसार राज्यात दुष्काळ, नापिकी आणि कर्जबाजारीपणामुळे ३,०३० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद असून माहे जानेवारी, २०१७ ते मार्च, २०१७ या तीन महिन्यात ६३९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाडा विभागात दिवसाला सरासरी तीन कर्जबाजारी शेतकरी आत्महत्या करीत असल्याचे विभागीय आयुक्तालयाच्या अहवालातून समोर आले असून बीड जिल्हयात नापिक व कर्जबाजारीला कंटाळून पांडुरंग घुगे या शेतकऱ्यांनी पत्नीला व दोन मुलांना विष देऊन तसेच स्वत: विष घेऊन आत्महत्या केल्याची घटना दिनांक १२ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) राज्यात दुष्काळ, नापिकी आणि कर्जबाजारीपणा व अन्य इतर कारणांमुळे सन २०१५ मध्ये राज्यात ३०३० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असे राष्ट्रीय गुन्हे माहिती संस्थेच्या (एनसीआरबी) अहवालात नमूद करण्यात आले आहे.

माहे जानेवारी, २०१७ ते मार्च, २०१७ या तीन महिन्यात राज्यात एकूण ६३९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) अंशत: खरे आहे, मात्र श्री.पांडुरंग घुगे यांनी पोटाच्या आजारास कंटाळून आत्महत्या केली असल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे.

(३) शेतकरी आत्महत्या पात्र प्रकरणी शासन निर्णय दिनांक २३ जानेवारी, २००६ अन्वये कुटुंबियांस रूपये १.०० लाख आर्थिक मदत दिली जाते. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी उस्मानाबाद व यवतमाळ या दोन जिल्ह्यांमध्ये पथदर्शी प्रकल्प बळीराजा चेतना अभियान राबविण्यात येत आहे. तसेच शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यासाठी “छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७” राबविण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सोयाबीन पिक विम्याची रक्कम मिळण्याबाबत

**(६१) * ३२१२० श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यात सोयाबीनचे नुकसान होवूनही गत दोन वर्षापासून पीक विमाची रक्कम शेतकऱ्यांना मिळाली नसल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पीक विम्याची रक्कम शेतकऱ्यांना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) व (२) हे खरे नाही. यवतमाळ जिल्हयात राष्ट्रीय कृषि विमा योजना खरीप हंगाम २०१५ मध्ये भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत, तसेच, प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप हंगाम २०१६ मध्ये रिलायन्स इन्शुरन्स कंपनीमार्फत राबविण्यात आली. खरीप हंगाम २०१५ मधील पात्र लाभार्थी शेतकऱ्यांना नुकसान भरपाई अदा करण्यात आलेली आहे. तर खरीप हंगाम २०१६ मधील पात्र लाभार्थी शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्यासाठी संबंधित बँकाकडे वर्ग करण्यात आलेली आहे.

योजनेंतर्गत जिल्हयातील सोयाबीन पिकासाठी सहभागाचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| हंगाम | सहभागी शेतकरी (लाख) | क्षेत्र लाख हे. | विमा हप्ता रक्कम रु.कोटी | लाभार्थी शेतकरी (लाख) | नुकसान भरपाई रक्कम रु. कोटी |
|---|---|---|---|---|---|
| खरीप २०१५ | १.६० | १.८४ | ११.८० | १.२२ | ९५.८५ |
| खरीप २०१६ | १.४७ | १.४० | १०.११ | ०.३५ | २३.४० |

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**करुळ घाट (ता.वैभववाडी,जि.सिंधुदुर्ग) मार्गावरील कठड्यांची दुरुस्ती करण्याबाबत**

**(६२) * ३१०४९ श्री.नारायण राणे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वैभववाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील करुळ घाटमार्ग संरक्षण कठड्याच्या पडझडीमुळे वाहतुकीसाठी धोकादायक झाला असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने घाट मार्गातील संरक्षण कठडे बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशंत: खरे आहे.

घाटात दरडी कोसळल्याने काही ठिकाणी संरक्षक भिंती क्षतिग्रस्त झाल्या आहेत. या ठिकाणी बॅरल्स लावून व पांढरे पट्टे मारुन वाहतूक सुरळीत चालू ठेवण्यात आली आहे.

(२) व (३) क्षतिग्रस्त संरक्षक कठडे दुरुस्त करणे व नव्याने बांधण्याचे काम मंजूर असून निविदा स्तरावर आहे.

निधिच्या उपलब्धतेनुसार काम हाती घेवून पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## भंडारा जिल्हयातील निलज व इतर रेती घाटांवर अवैधरित्या वाळू उपसा होत असल्याबाबत

**(६३) * ३३३०१ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हयातील निलज व इतर रेती घाटांवर अवैधरित्यावाळू उपसा करण्यात येत असल्याचे माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सायंकाळी ६ वाजल्यानंतर उपसा करण्यास प्रतिबंध असतांना नियमबाहयरित्या पोकलॅड, जेसीबी व टिप्परचा पावर करुन रेती उत्खनन करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अवैध रेती उत्खननास प्रतिबंध करणाऱ्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांवर रेतीमाफियांकडून अनेकदा जिवघेणे हल्ले होत असल्याने रेतीमाफीयांवर कारवाई करण्याच्यादृष्टीने पोलीस विभागाच्या सहकार्याने संयुक्तीकरित्या गोपनीय धाड टाकण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी जिल्हाधिकारी, भंडारा यांचेकडे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) भंडारा जिल्ह्यातील मौजे निलज या रेतीघाटावर माहे मार्च, २०१७ वा त्यादरम्यान वाळूचा अवैधरित्या उपसा होत असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

तथापि, मौजे बेटाळा ता. मोहाडी येथील रेतीघाटास तहसीलदार मोहाडी यांच्या अधिनस्त भरारी पथकाने दिनांक १४/०४/२०१७ रोजी भेट दिली असता, सदर रेतीघाटालगतच्या परिसरात १६ ट्रॅक्टर वाळूचे अवैधरीत्या वाहतूक करताना निदर्शनास आले. त्यानुसार संबंधित ट्रॅक्टर मालकांवर कारवाई करून रुपये १,६६,४००/- एवढा दंड वसूल करून शासनजमा करण्यात आलेला आहे.

मौजे भोजापूर, ता. पवनी या रेतीघाटास तहसिलदार पवनी यांनी दिनांक २५/०४/२०१७ रोजी आकस्मिकपणे भेट दिली असता लिलावधारकांमार्फत यांत्रिक साधनांच्या सहाय्याने वाळूचे अवैध उत्खनन केल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार लिलावधारकांमार्फत पर्यावरणविषयक अटींचा भंग झाल्याने अपर जिल्हाधिकारी भंडारा यांच्या दिनांक १९/०५/२०१७ रोजीच्या अंतरिम आदेशान्वये लिलावधारकांची पर्यावरण अटीच्या पालनार्थ ठेवलेली बँक गॅरंटी शासनजमा करण्यात आलेली आहे.

भंडारा जिल्ह्यातील निलज व इतर घाटांवर मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा करणाऱ्या रेती कंत्राटदारावर कार्यवाही करण्याबाबत दिनांक ५/५/२०१७ रोजीचे निवेदन लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी भंडारा यांच्याकडे दिले असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुसार भंडारा जिल्ह्यातील रेतीघाटांची ड्रोनद्वारे पाहणी करण्यात आली असता, मौजे ईटगाव ता. पवनी, मौजे चारगांव ता. तुमसर, मौजे वलनी ता. पवनी, मौजे भोजापूर ता. पवनी व मौजे मांगली-ईसापूर ता. पवनी या रेतीघाटांवर यांत्रिक साधनांच्या सहाय्याने रेतीचे अवैध उत्खनन केल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार अपर जिल्हाधिकारी भंडारा यांनी दिनांक २३/०६/२०१७ रोजीच्या आदेशान्वये संबंधित लिलावधारकांची सुरक्षा ठेव रक्कम जप्त करून शासनजमा करून लिलावधारकांमार्फत नव्याने सुरक्षा ठेव रक्कम शासनजमा होईपर्यंत रेतीघाट बंद केले आहेत.

भंडारा जिल्ह्यातील गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीस प्रतिबंध घालण्याकरीता महसूल विभाग, पोलिस विभाग व परिवहन विभाग यांचा समावेश असलेल्या भरारी पथकांमार्फत माहे एप्रिल, २०१७ ते माहे जून, २०१७ या कालावधीत वाळूच्या अवैध उत्खनन व वाहतुकीच्या २६३ प्रकरणांमध्ये कारवाई करून रुपये २,१७,८९,३९३/- एवढ्या दंडाची रक्कम वसूल करून शासनजमा करण्यात आली आहे.

अवैध रेती उत्खननास प्रतिबंध करणाऱ्या अधिकारी/ कर्मचारी यांच्यावर रेतीमाफियांकडून हल्ले झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई शहराच्या प्रवेशव्दारावरील पाच टोल व पुणे-मुंबई एक्सप्रेस हायवेवरील टोलनाके बंद करण्याबाबत

**(६४) * ३०९३६ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.तानाजी सावंत, श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.प्रकाश गजभिये : तारांकित प्रश्न क्रमांक २४३३९ ला दिनांक ८ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे "एक्सप्रेस-वे" वर टोल वसुली करण्यासाठी नेमलेल्या कंत्राटदाराने ठरलेल्या रक्कमेहून अधिक रक्कम या आधीच वसूली केल्याने त्यांचे कंत्राट बंद करुन टोल मुक्त करावा, तसेच टोल वसुलीच्या नावाखाली वाहकांची बेकायदा लुट करणाऱ्या संबंधीत अधिकारी व कंत्राटदार यांच्यावर गुन्हे नोंदवावेत अशी मागणी सामाजिक व टोल अभ्यासक कार्यकर्त्यांनी मा.मुख्यमंत्री आणि मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे आणि मुंबईतील पाच प्रवेशद्वारावरील टोलनाक्यांबाबत सनदी अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापन केली असताना त्यांचे निवृत्तीनंतर या समितीचे प्रमुख व राज्याचे मुख्य सचिवांच्या समितीने दिनांक २७ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास सदरहू टोल बंद करण्याबाबत शिफारसीचा अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गाच्या प्रकल्पाचा एकूण किती खर्च झाला आहे, अद्यापपर्यंत कंपनीने टोल वसुलीच्या नावाखाली एकूण किती रुपये वसूल केले आहेत व किती अतिरिक्त टोलची रक्कम वसूल केल्याचे आढळून आले आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर महामार्ग टोल मुक्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय.

अशा आशयाची तक्रार जानेवारी, २०१७ मध्ये प्राप्त झाली आहे.

(२) अप्पर मुख्य सचिव (सा.बां.) यांचे अध्यक्षतेखालील समितीने तयार केलेला अहवाल शासनास दिनांक २७/०४/२०१७ रोजी नसून दिनांक २७/०४/२०१६ रोजी प्राप्त झाला आहे. सदरचा अहवाल शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) सदरहू मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाच्या मूळ बांधकामासाठी रुपये २१२३ कोटी इतका खर्च झाला आहे. मे. आय. आर. बी. पी. एल. कंपनीने रुपये ९१८ कोटी अग्रीम रक्कम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे भरुन १५ वर्षासाठी पथकर वसुलीचे अधिकार त्यांना प्रदान करण्यात आले आहेत. माहे जून, २०१७ पर्यंत मुंबई पुणे द्रुतगती मार्गावर रुपये ३३८४.२७ कोटी इतक्या पथकराची वसुली झाली आहे.

(४) पथकर वसुलीचे १५ वर्षाचे अधिकार मे. मे. आय. आर. बी. पी. एल. या कंपनीस (दिनांक ०९/०८/२००४ ते दिनांक ०८/०८/२०१९ पर्यंत) दिले असल्याने चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रहिमतपूर ते वाठार (किरोल) (जि.सातारा) रस्त्यावरील पूलास संरक्षक कठडे बांधण्याबाबत

**(६५) * ३१०४१ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रहिमतपूर ते वाठार (किरोल) (जि.सातारा) रस्त्यादरम्यान वाठारजवळ असलेल्या अरुंद पुलास संरक्षक कठडे नसल्याने अपघात होत असल्याचे दिनांक २३ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पूलाचे रुंदीकरण, संरक्षक कठडे बांधणे तसेच पुलाचा पाया भक्कम करण्याबाबत कनिष्ठ अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे मंजूरीसाठी पाठविलेले प्रस्ताव प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील आरे दुग्धशाळेतील दूध पुरवठ्यात घट झाल्याबाबत

**(६६) * ३१७६९ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील आरे दुग्धशाळेमध्ये दुधाचा पुरवठा होत नसल्यामुळे ग्राहकांची गैरसोय होत असून आरे केंद्रावर दूध मिळत नसल्यामुळे दूध वितरक आर्थिक अडचणीत आल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील आरेचे दूध वितरण घटल्याने दुग्धशाळेपासून दूध केंद्रापर्यंत दूध वाहतूक करणाऱ्या वाहतूकदारांनी वाहतूक करणार नसल्याचे दुग्धविकास आयुक्तांना माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान कळविले आहे, हे ही खरे आहे,

(३) असल्यास, मुंबई महानगरपालिकेने सदरहू केंद्रे काढण्याबाबतची कारवाई सुरु केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार आरे दुग्धशाळेस सहकारी दूध संघाकडून दूध पुरवठा वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) अंशत: खरे आहे.

(२) दूध वितरक सेनेने याबाबत मौखिक सूचना दिनांक ०१/०६/२०१७ रोजीच्या बैठकीत दिली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही. शासनाचे दूध खरेदी दर राज्यातील इतर सहकारी व खाजगी दूध प्रकल्पांच्या दूध खरेदी दराच्या तुलनेत (२१ जून, २०१७ पूर्वी) २ ते ४ रुपये प्रतिलिटर कमी असल्याने शासनाकडील दूधाची आवक कमी झालेली होती. सबब दिनांक २१/०६/२०१७ पासून शासनाच्या दूध खरेदी दरात रुपये ३/- प्रति लिटर वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे शासकीय दूध योजनेकडील दूध आवक वाढणे अपेक्षित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### बांदा (जि.सिंधुदुर्ग) येथील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(६७) * ३२६८२ ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बांदा (जि.सिंधुदुर्ग) येथे चक्रीवादळामुळे शेतकऱ्यांचे रूपये ६० लाखांचे नुकसान झाल्याचे दिनांक ६ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) अवेळी पाऊस व गारपिटीमुळे शेतीपिकांची नुकसानभरपाई देण्यासाठी, झालेल्या नुकसानीची आकडेवारी क्षेत्रिय कार्यालयांकडून अचूक पंचनामे करुन मागविण्यात आली आहे. सदर माहिती संकलीत करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. यासंदर्भात प्राप्त होणाऱ्या माहितीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबचा निर्णय घेण्याची बाब प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### पोलादपूर (जि.रायगड) तालुक्यातील गावांना माती उत्खननामुळे निर्माण झालेला धोका

**(६८) * ३२९३२ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलादपूर (जि.रायगड) तालुक्यात माती उत्खननामुळे २५ गावांना भूस्खलन आणि दरड कोसळण्याचा धोका निर्माण झाल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर गावांच्या सुरक्षेकरिता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) पोलादपूर तालुक्यातील मौजे चोळई येथे खाजगी जमीन मालकांनी जमिनीचे सपाटीकरण करण्यासाठी उत्खनन केले असून, सदर ठिकाणी दरड कोसळण्याची शक्यता निदर्शनास आली. त्यानुसार तेथील रहिवाशांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यासाठी तलाठी पोलादपूर यांच्यामार्फत नोटीस देण्यात आलेली आहे. तसेच मौजे लोहारे, ता. पोलादपूर येथील काही रहिवाशांना दरड कोसळण्याची शक्यता असल्याने सुरक्षित स्थळी स्थलांतरीत होण्याबाबत तलाठी लोहारे यांचेमार्फत नोटीस बजावण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पिंपरी (जि.पुणे) भागातील अवैध उत्खनन रोखण्याबाबत**

**(६९) * ३१२९५ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.जयंत पाटील, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी (जि.पुणे) भागातील पवना धरण परिसरातील मावळ, भडवली, शिवली, मळवंडी, ठुले व इतर गावात अवैधरित्या बेकायदा उत्खनन केले जात असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महसूल विभागाच्या सहकार्यानेच हे अवैध उत्खनन होत असल्याने या भागात माळीण सारख्या घटनेची पुनरावृत्ती होण्याचा धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवैध उत्खनन रोखण्याबाबत तसेच अवैध उत्खननास सहकार्य करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) पुणे जिल्हयातील पवना धरण परिसरात माहे एप्रिल, २०१७ ते माहे मे, २०१७ या कालावधीदरम्यान तहसिलदार मावळ यांनी गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुक करणाऱ्या एका वाहनावर कारवाई करून, रूपये २०,६४०/- एवढा दंड वसूल करून शासनजमा केला आहे.

सदर भागात माळीण सारख्या घटनेची पुनरावृत्ती होण्याचा धोका निर्माण झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## एटापल्ली (जि.गडचिरोली) तालुक्यात भूमी अभिलेख कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(७०) * ३२७४९ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एटापल्ली (जि.गडचिरोली) तालुक्यातील मुख्यालयी असलेल्या भूमि अभिलेख कार्यालयातील एकूण मंजूर १७ पदांपैकी ९ पदे रिक्त असल्याने कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा बोजा वाढत असून नागरिकांची दैनंदिन व इतर अनेक कामे प्रलंबित राहत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कार्यालयातील रिक्त पदे भरण्यात यावी अशी मागणी स्थानिक नागरिकांनी जिल्हाधिकारी, गडचिरोली यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) सदर कार्यालयामध्ये गट-क आणि गट-ड संवर्गातील कर्मचाऱ्यांची एकूण १७ पदे मंजूर असून, माहे जून, २०१७ अखेर त्यापैकी ०७ पदे रिक्त आहेत. तथापि, उपलब्ध कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने नागरीकांची दैनंदिन कामे वेळीच पार पाडली जात आहेत.

(२) असे निदर्शनास आले नाही.

(३) व (४) सदर रिक्त पदे सरळसेवा भरती व पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## राज्यातील ठिबक व तुषार सिंचनाचा निधी शेतकऱ्यांना अदा करण्याबाबत

**(७१) * ३१०६२ डॉ.अपूर्व हिरे, डॉ.सुधीर तांबे : तारांकित प्रश्न क्रमांक २६७७६ ला दिनांक १० मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात केंद्र पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजनेंतर्गत सन २०१३-२०१४ व सन २०१४-२०१५ या वर्षातील पूर्व संमती दिलेले अंदाजे अनुक्रमे रुपये १२६ कोटी व रुपये ५२ कोटी असे एकूण रुपये १७८ कोटी एवढया रक्कमेचे प्रस्ताव प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून प्रलंबित लाभार्थी शेतकऱ्याचे प्रस्ताव निकाली काढण्याकरीता निधी उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, सन २०१३-२०१४ व सन २०१४-२०१५ यावर्षीतील सर्व लाभार्थी शेतकऱ्याचे प्रलंबित अनुदानाचे वितरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) अंशत: खरे आहे.
(२) शेतकऱ्यांना प्रलंबित अनुदानाच्या रकमेचे प्रदान करण्यासाठी दिनांक २४.३.२०१७ च्या शासन निर्णयान्वये आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
(३) ५९६६५ लाभार्थ्यांपैकी ५३००२ लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर रुपये १५८ कोटी एवढा निधी जमा करण्यात आला आहे. उर्वरित लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर अनुदान जमा करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्हयात बोगस कापूस बियाणांची विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(७२) * ३३७४६ श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महागांव, पुसद, उमरखेड, दिग्रस व वणी (जि.यवतमाळ) तालुक्यात कापूस बियाणांच्या विक्रीस बंदी असतांना येथील कृषी केंद्रावर बोगस कापूस बियाणे विकली जात असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, फुलसावंगी (ता.महागाव, जि.यवतमाळ) येथील कृषी केंद्रासमोरील उभ्या असलेल्या वाहनातून शासनाने बंदी घातलेले कापूस बियाणे वान ६५९ ची विक्री होत असल्याचे तसेच वणी तालुक्यातील कृषी बाजारात कापसाचे बियाणांच्या २१ वाण बोगस असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार बोगस बियाणांची विक्री करणाऱ्यांवर तसेच बोगस बियाणे पकडून सुध्दा कोणतीच कारवाई न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) व (२) वणी तालुक्यातील साई कृषि केंद्रावर विक्रीसाठी प्रतिबंधित R-cot-६, R-६५९ जातीच्या कापूस बियाणांच्या पाकीटांची विक्री केली जात असल्याचे दिनांक ०८ जून, २०१७ रोजी निदर्शनास आले.

तसेच, फुलसावंगी, ता.महागांव येथील गौरीशंकर कृषि केंद्राच्या मालकीच्या वाहनामध्ये विक्रीस प्रतिबंधीत R-६५९ या जातीच्या कापूस बियाणांचा साठा दिनांक १५ जून,२०१७ रोजी आढळून आला.

पुसद, उमरखेड, दिग्रस या तालुक्यातील कृषि केंद्रांवर विक्रीस प्रतिबंधीत कापूस बियाणांची विक्री केली जात असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३) सदर प्रकरणी केलेल्या चौकशीत साई कृषि केंद्र, वणी व गौरीशंकर कृषि केंद्र, फुलसावंगी ता. महागांव,जि.यवतमाळ या दोन्ही केंद्रांवर विक्रीस प्रतिबंधीत कापूस बियाणांची अनुक्रमे विक्री केली जात असल्याचे व अवैध साठा करण्यात आल्याचे आढळून आले. त्यानुषंगाने दोन्ही कृषि सेवा केंद्रांचे बियाणे परवाने निलंबित करण्यात आलेले असून दोन्ही कृषि केंद्रांविरूद्ध अनुक्रमे वणी व महागांव पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### भीमा कोरेगाव (जि.पुणे) येथील क्रांतीस्तंभाच्या जमिनीवर झालेले अतिक्रमण हटविण्याबाबत

**(७३) * ३२८०४ आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भीमा कोरेगाव (जि.पुणे) येथील क्रांतीस्तंभाच्या १० एकर जमिनीवर अतिक्रमण करण्यात आले असून शासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार क्रांतीस्तंभ परिसराचा ऐतिहासिक व पर्यटन स्थळ म्हणून विकास करण्याच्यादृष्टीने तेथील अतिक्रमण हटविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) भीमा कोरेगाव, जि.पुणे येथील स.नं.१०३३ मधील जयस्तंभाच्या जमिनीवर असलेले व्यापारी स्वरुपाचे अतिक्रमण तहसिलदार, हवेली पुणे यांचेमार्फत दिनांक ०८/०६/२०१७ रोजी रितसर नोटीस देऊन निष्कासित करण्यात आले आहे.

तथापि, अद्याप सदर जागेवर श्री.गुलाबराव बाबुराव माळवदकर या व्यक्तीचे घर असून सदर घराची नोंद फेरफार क्र.११९४ अन्वये सन १९९२ मध्ये करण्यात आली होती व त्यांच्या वारसांची नोंद फेरफार क्र.२०९३ अन्वये सन २००० साली करण्यात आली होती. उपरोक्त दोन्ही फेरफार उपविभागीय अधिकारी, हवेली यांच्याकडून पुनरीक्षणात घेऊन दिनांक ०५/०६/२०१७ च्या आदेशाने रद्द करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **उत्तमसिंग चव्हाण**

**मुंबई.** **सचिव,**

**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.